

# भारतीय कोण आहे?

## एनआरसी-एनपीआर-सीएबीच्या युगात नागरिकत्व

cjp



# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रस्तावना | 03 |
| पक्षपाती नागरिकत्व | 08 |
| नागरिकत्व म्हणजे काय? | 17 |
| संपूर्ण भारत | 20 |
| आसाम | 22 |
| परकीय नागरिक चर्चा: आसाम | 24 |
| आसाममधील एनआरसी | 30 |
| राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी | 48 |
| अखिल भारतीय एनआरसी | 51 |
| आपण काय केले पाहिजे? | 53 |


अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या www.cjp.org.in/who-is-indian/

# प्रस्तावना

नागरिकत्वाचा मुद्दा हा कोणत्याही व्यक्तीच्या अस्तित्वाचे मूळ आहे आणि म्हणूनच त्याला *हक्क देणारा हक्क* असेही म्हटले जाते.

नागरिकत्व अनेक प्रकारे व्यक्ती आणि राज्य यांच्यातील संबंध निश्चित करते. स्वतंत्र झाल्यावर (१९४७) आणि त्यानंतर एक सर्वसमावेशक आणि संयुक्त राष्ट्र म्हणून दृढपणे प्रस्थापित झाल्यावर (राज्यघटनेतील कलम ५ ते ११ ही भारतीय नागरिकत्वाचा आधार आहेत), भारताने १९५० मध्ये सर्व लोकांचा धर्म, पंथ, जाती, भाषा आणि लिंग अशा कोणत्याही भेदभावाशिवाय भारतीय म्हणून स्वीकार केला.

गेल्या सहा वर्षांमध्ये अखिल भारतीय स्तरावर या घटनात्मक पायालाच धक्का लावण्याच्या राजकीय हालचाली स्पष्टपणे घडताना दिसत आहेत. आधी, प्रस्तावित नागरिकत्व दुरुस्ती विधेयकाद्वारे (जे २०१६ मध्ये रद्द झाले आणि ईशान्येच्या राज्यांसंबंधी काही बदलांसह पुन्हा सादर करण्यात आले आणि संसदेच्या २०१९च्या हिवाळी अधिवेशनात ते संमत झाले) आणि नंतर घाईगडबडीत आणि अयोग्यपणे देशपातळीवर राबवल्या गेलेल्या राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) प्रक्रियेद्वारे. म्हणूनच, भारतीय समाजात प्रचंड उलथापालथ माजवण्याची क्षमता असलेल्या या चर्चेचा प्रत्येक मुद्दा प्रत्येक भारतीयाने व्यवस्थितपणे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेक राज्ये, शहरे आणि प्रदेशांमध्ये आत्तापासूनच भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे; म्हणूनच हे प्रश्न सविस्तरपणे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे बनले आहे.

आसाम हे ईशान्येकडच्या सात राज्यांपैकी एक राज्य या प्रक्रियेशी लढा देत आहे; २०१३ पासून हा संघर्ष अधिकच तीव्र बनला आहे. आत्महत्या किंवा आघातामुळे जवळपास १०० जणांचा मृत्यू (अटक छावणीत किंवा बाहेर) झाल्याची आम्ही नोंद केली आहे, त्यापैकी फक्त छावण्यांमध्येच २८ मृत्यू झाले आहेत. आसामच्या जनतेला विशेषतः तिच्या भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्यांक समुदायाला जे काही सहन करावे लागले आहे त्याच्या हृदय पिळवटून टाकणाऱ्या कहाण्या ऐकूनच धास्तावलेल्या शेजारच्या बंगालमध्ये केवळ गेल्या तीन महिन्यांमध्ये ११ जणांचा आत्महत्या किंवा धसक्याने मृत्यू झाला आहे. महाराष्ट्रानेसुद्धा मुंबईच्या बाहेर एक अटक छावणी (डिटेंशन कॅंप) उभारण्याची घोषणा केली आहे. कर्नाटकाने तर केवळ अटक छावणी उभारण्याची घोषणाच केली नाहीये तर “बेकायदा बांगलादेशी” विरुद्ध कारवाईला सुरुवात देखील केली आहे.

सिटिझन्स फॉर जस्टिस अँड पीस (सीजेपी) ही न्यायालयांमध्ये आणि बाहेरही आपल्या मूलभूत हक्कांचे समर्थन आणि संरक्षण करण्याला वाहून घेतलेली मानवाधिकार चळवळ या कळीच्या मुद्द्यावर २०१७ पासून २४ X ७ काम करत आहे. आसाममध्ये सातशेहून अधिक

स्वयंसेवकांच्या आमच्या टीमने हजारो लोकांना अत्यंत क्लिष्ट अशा एनआरसी प्रक्रियेमध्ये मार्गदर्शकाचे काम केले आहे; जसे की फॉर्म भरून एनआरसी केंद्रांबाहेर रांगेत उभे राहणे, यादीतून वगळलेल्यांचे समुपदेशन करून जीव वाचवणे, परदेशी नागरिक न्यायाधिकरणांसमोर आणि वरच्या न्यायालयांमध्ये कायदेशीर हक्कांसाठी लढणे. (https://cjp.org.in/assam/).

आता सीजेपीने भारतभर कार्यविस्तार केला आहे. भारताच्या सर्व राज्यांमध्ये स्थापना केल्यानंतर सीजेपी मोठ्या प्रमाणावर लोकांच्या बैठका भरवत आहे, कार्यकर्त्यांना आणि समुदायांच्या नेत्यांना प्रशिक्षण देत आहे, अखिल भारतीय एनआरसी आणि नागरिकत्वाचा प्रश्न याबाबत साहित्याचे वितरण करत आहे. मुंबई, मालेगाव, बेंगलुरू, हैदराबाद, कोलकाता, पुरी, उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथे आजवर बैठका झाल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या विशेषतः दुर्बल आणि उपेक्षित व्यक्तींच्या हक्कांसाठी लढण्याचा **तुमच्यासारख्या लोकांचा दृढनिश्चय** हीच सीजेपीची ताकद आहे.




| Become a Friend | Become a Volunteer | CJP's work in Assam | Contact for Trainings/NRC Kit |
|---|---|---|---|
| https://cjp.org.in/friend/ | https://cjp.org.in/volunteer/ | https://cjp.org.in/assam/ | info@cjp.org.on |

अभूतपूर्व अशा ऐक्याचे दर्शन घडवत, ६ सप्टेंबर, २०१९ रोजी, **पश्चिम बंगाल** विधानसभेने आसाममधील राष्ट्रीय नागरिक नोंदणीला (एनआरसी) विरोध करणारा ठराव मंजूर केला. राज्यामध्ये अशी प्रक्रिया राबवली जाण्याची शक्यताही ठरावामध्ये स्पष्टपणे फेटाळली आहे. सदनाच्या कामकाजाच्या आचरण प्रक्रियेच्या नियमांपैकी नियम १८५ नुसार मांडण्यात आलेल्या या ठरावाला सत्ताधारी तृणमूल काँग्रेस पक्षाच्या सदस्यांबरोबरच विरोधकांपैकी डावे पक्ष आणि काँग्रेसच्या सदस्यांनीही समर्थन दिले. तीन तासांच्या चर्चेनंतर पारित करण्यात आलेल्या या ठरावाचा केवळ मुठभर भाजप सदस्यांनी विरोध केला. आपल्याला भारतीय घटनेच्या लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांच्या रक्षणासाठी वचनबद्ध असलेल्या भारतभरातील सर्व राजकीय पक्षांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे. मात्र, राज्य सरकारकडून बंगालमध्ये अटक छावणी

स्थापन करण्याच्या गोंधळात टाकणाऱ्या घोषणेमुळे काही प्रमाणात चिंता निर्माण झाली आहे.

पंजाबचे मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग यांनी डिसेंबर २०१९च्या सुरुवातीला सीएबी २०१९ तसेच प्रस्तावित अखिल भारतीय एनआरसीला तीव्रपणे विरोध केला. सीएबी २०१९ घटनात्मक भावनेच्या विरोधात असल्याचे सांगत ते असेही म्हणाले की पंजाब विधानसभेमध्ये सीएबी २०१९ संमत होऊ देणार नाही. सिंग यांनी नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्सचही (एनआरसी) "भारतासारख्या स्वतंत्र देशाच्या लोकशाही भावनेविरूद्ध" असल्याचेही सांगत जोरदार विरोध केला आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनीही सीएबी / सीएए २०१९ च्या विरोधात वक्तव्य केले आहे.

आपल्यासमोरील आव्हानाचा एक भाग म्हणजे विरोधी पक्ष (विशेषत: त्यांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये) या दोन्ही धोरणांचे परिणाम पूर्णपणे समजून घेतील हे सुनिश्चित करणे: सीएबी २०१९ आणि अखिल भारतीय एनपीआर-एनआरसी.

फक्रुद्दीन अली अहमद भारताचे पाचवे राष्ट्रपती होते. अत्यंत क्रूर चेष्टा म्हणजे, त्यांच्या कुटुंबातील जवळच्या सदस्यांनाही अंतिम एनआरसीच्या मसुद्याच्या बाहेर ठेवले गेले! यासाठी एनआरसी आणि निवडणूक आयोगाचे अधिकारी दोघेही तितकेच दोषी आहेत. झियाउद्दीन हा त्याचा पुतण्या आहे.

तो लेफ्टनंट कर्नल जालनूर अली अहमद यांचा नातू आहे, जे एमबीबीएस पदवी उत्तीर्ण झालेले आणि डॉक्टर म्हणून पात्र ठरलेले आसाममधील पहिले व्यक्ती होते. सुमारे ५० वर्षांचे असलेले झियाउद्दिन अली अहमद हे अत्यंत साधे असून ते अल्पभूधारक शेतकरी आणि हंगामी मच्छीमार आहेत.

पुरामुळे आसाममधील लोकांची कागदपत्रे नष्ट होतात हे सर्वश्रुत आहे आणि १९८४च्या पुरामध्ये या कुटुंबाचीही सर्व कागदपत्रे नाहीशी झाली होती. वारसा कागदपत्रे आणि इतर काही कागदपत्रे मिळवण्यासाठी हा माणूस राज्यातल्या अनेक कार्यालयांमध्ये वणवण भटकला. दिल्ली आणि इतर सर्व ठिकाणी सुद्धा त्यांनी शोध घेतला जिथे लेफ्टनंट कर्नल जालनूर अली अहमद आणि फक्रुद्दीन अली अहमद राहिले होते. पण दुर्दैव!

जमिनीच्या कागदपत्रांचा सुद्धा काडीचाही उपयोग झाला नाही. अखेरीस काही स्थानिक गावकऱ्यांनी जेव्हा त्यांच्या भूमी करांच्या पावत्या सादर केल्या त्यापैकी काहींवर खुद्द फक्रुद्दीन आली अहमद यांची स्वाक्षरी होती तर काहींवर अहत्रमुद्दीन अली अहमद यांची स्वाक्षरी होती! त्यानंतर नावात तफावतीचा म्हणजे त्याच्या वडिलांच्या नावाच्या स्पेलिंगचा घोळ पुढे आला:



काही लोक त्यांना अक्रमुद्दीन अली अहमद असेही म्हणायचे! अखेरीस गावातील बुजुर्ग लोकांनी ठामपणे सांगितले की अहत्रमुद्दीन अली अहमद आणि अक्रमुद्दीन अली अहमद या दोन्ही एकच व्यक्ती आहेत. त्यानंतर सीजेपीच्या टीमने बरकुकुरिया आणि जवळील खेड्यांतील कॅडस्ट्रल (भूमी) अहवालाची केलेली तपासणी निर्णायक ठरली: त्यामध्ये अशी स्पष्ट नोंद होती की संपूर्ण जमीन दहा जणांच्या संयुक्त मालकीची आहे: फक्रुद्दीन अली अहमद, जलालुद्दीन अली अहमद, अहत्रमुद्दीन अली अहमद, शिवाय इतर दोन पुरुष व पाच महिला, जे सर्व लेफ्टनंट कर्नल जालनूर अली अहमद यांची मुले किंवा मुली आहेत.

मतदार ओळखपत्रात तफावत: आपल्या वडिलांशी नातेसंबंध सिद्ध करण्यासाठी जलालुद्दीन अली अहमदकडे अद्याप कोणतेही वैध कागदपत्र नाही! मतदार ओळखपत्र आणि मतदारयादी ही एकमेव उपलब्ध कागदपत्र आहे जे स्वीकारार्ह ठरू शकले असते. परंतु निवडणूक आयोगाने तयार आणि अद्ययावत केलेल्या या कागदपत्रांमध्ये त्याचे स्वत:चे व त्याच्या वडिलांचेही नाव चुकीचे नोंदवले गेले आहे. झियाउद्दीन अली अहमद यांचा मुलगा साजिद अली अहमद याने नावातील चूक सुधारण्यासाठी निवडणूक आयोगाकडे एकापेक्षा जास्त वेळा अर्ज केला आहे. मात्र ते घडलेले नाही. मग याला जबाबदार कोण?

एनआरसी प्रक्रियेबाबत आसामचा भयंकर अनुभव राष्ट्रीय स्तरावरील चर्चेत माहिती देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. जी प्रक्रिया अनेक हितसंबंधींच्या सहभागातून एक संमतीपूर्ण कार्यक्रम म्हणून सुरू झाली होती ती राजकारणी आणि नोकरशहांच्या कारस्थानामुळे अत्यंत गलिच्छ बनली असून तिच्या शेवटच्या यादीमध्ये १९ लाखांहून अधिक लोकांना वगळले आहे. त्याआधी डिसेंबर २०१७ मध्ये १.२ कोटी लोकांना, तर ३१ जुलै २०१८ रोजी ४४ लाख लोकांना वगळले

होते. राज्यात किती ‘अवैध स्थलांतरित आहेत’ हे दाखवण्याची ‘टार्गेट्स पूर्ण’ करण्याचा विडा उचललेल्या राज्यामुळे प्रत्येक फेरीनंतर वगळण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला आणि कुटुंबाला अनन्वित छळ सोसावा लागला. यामध्ये आसाम विधानसभेच्या पहिल्या उपसभापतींचा, भारतीय सेनेत कर्तव्य बजावलेल्या आणि शत्रूंशी युद्धात लढलेल्यांचा, सर्व कागदपत्रे व्यवस्थितपणे पूर्ण असलेल्या कित्येक महिला आणि मुलांचा समावेश होता.

आसाम एनआरसी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत ज्या व्यक्तींना अतोनात हाल सोसावे लागले त्यांच्या हृदयद्रावक कहाण्या पुढे येत आहेत. आसाममधील उपेक्षित घटकांचे यामुळे प्रचंड मानसिक आणि आर्थिक हाल झाले. आत्महत्या किंवा आघातामुळे झालेल्या जवळपास शंभर मृत्यूंची (अटक छावणीत किंवा बाहेर) नोंद सीजेपीने केली आहे, त्यापैकी फक्त छावण्यांमध्येच २८ मृत्यू झाले आहेत. नागरिकत्वाच्या यादीतून वगळल्या गेलेल्यांचे भवितव्य आता परदेशी नागरिक न्यायाधिकरणांच्या (एफटी) हातात आहे, ज्यांची कामगिरी आतापर्यंत अत्यंत वाईट आणि अव्यावसायिक राहिली आहे. आसाममधील परदेशी नागरिक न्यायाधिकरणांचे कामकाज पारदर्शक नसल्यामुळे ती खुलेआम पक्षपातीपणासाठी कुप्रसिद्ध आहेत; साक्षीपुराव्यासंबंधीच्या प्रक्रियेचा अभाव असणे आणि एकूणच नैसर्गिक न्याय नाकारला जाणे हे सामान्य बनले आहे. उद्दाम कार्यकारी यंत्रणेच्या (सरकार) वाढत्या हस्तक्षेपामुळे प्रकरण अधिकच चिघळले आहे. उच्च न्यायव्यवस्थेने या प्रकारांना फारच थोड्या प्रमाणात आळा घातला आहे.

एकदा का एफटीने एखाद्याला परकीय नागरिक घोषित केले की त्याला अटक छावणीत पाठवले जाण्याची शक्यता असते. आसाममध्ये सहा अटक छावण्यांमध्ये सुमारे २००० हून अधिक लोकांना, सर्वसामान्यपणे कैद्यांना मिळणाऱ्या अधिकारांशिवाय डांबण्यात आले आहे, जिथे आत्तापर्यंत २८ जणांचा मृत्यू झाला आहे. या अटक छावण्यांमध्ये इतर भारतीय कारागृहांमध्ये असते त्याप्रमाणे कोणतेही मॅन्युअल नाही. अति जास्त गर्दी, स्वच्छतेच्या आणि आरोग्याच्या अत्यंत वाईट सुविधा, तसेच अपुऱ्या अन्नामुळे आणखीनच निराशाजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. आता, विद्यमान सरकारला या दोन्ही गोष्टी म्हणजेच अपारदर्शक संस्था, आसामसारखी परदेशी नागरिक न्यायाधिकरणे संपूर्ण भारतभर राबवण्याची इच्छा आहे.

अधिक माहितीसाठी हा व्हिडिओ पहा- सावल्यांच्या पल्याड: आसामच्या अटक छावण्यांमधल्या अन्यायाच्या कहाण्या

## पक्षपाती नागरिकत्व

नागरिकत्व कायद्यात (१९५५) दुरुस्ती करून काही विशिष्ट धर्मांच्या व्यक्तींना इतरांच्या तुलनेत विशेषाधिकार प्रदान करणारी कलमे घुसडण्याचे प्रयत्न २०१६ पासून सुरू आहेत जेव्हा पहिले नागरिकत्व दुरुस्ती विधेयक (२०१६) सादर करण्यात आले होते. सरकारच्या पहिल्या टर्ममध्ये ते रद्द झाले आणि आता पुन्हा मांडले आहे. हे सरकार भारतीय नागरिकत्वाचा समानतेच्या आणि धर्मनिरपेक्षतेच्या तत्वावर आधारित असलेला मूलभूत पायाच बदलू पाहत आहे. संसदेच्या डिसेंबर २०१९ च्या हिवाळी अधिवेशनात हे दुरुस्ती विधेयक मंजूर झाले आणि १२ डिसेंबरला राष्ट्रपतींच्या संमतीने त्याचे कायद्यात रूपांतर झाले.

नागरिकत्व दुरुस्ती विधेयक, २०१९ (आता कायदा, २०१९) पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या तीन देशांतील 'छळ होत असलेल्या अल्पसंख्याकांना' भारतात ३१ डिसेंबर २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी प्रवेश केला असल्यास भारतात आश्रय आणि नागरिकत्व देण्याचे आश्वासन देते. या तीन देशांतील हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन लोकांना विशेषाधिकार देऊन मुस्लिमांना वगळले आहे. उदाहरणार्थ, पाकिस्तानमध्ये नि:संशयपणे छळ केला जात असलेल्या अहमदिया किंवा सुफी अथवा केवळ राजकीय मतभेद असलेल्यांचाही दुरुस्ती विधेयकात उल्लेख नाही. तसेच म्यानमारमधील रोहिंग्या किंवा श्रीलंकेतील तमिळ यांच्यासारख्या संभाव्य आश्रय मागणाऱ्यांनाही यात कोणतेही स्थान देण्यात आलेले नाही.

पहिल्यांदाच केवळ काही विशिष्ट धर्माच्या लोकांना विशेषाधिकार देण्याचा त्याचबरोबर दुसऱ्या धर्माला, मुस्लिमांना, दुसऱ्या-दर्जाचे नागरिक मानण्याचा संवैधानिक प्रयत्न केला जात आहे. भारताचा नागरिकत्व कायदा, १९५५ मधील दुरुस्तीला केवळ या एका कारणानेच जोरदार विरोध करणे आवश्यक आहे, कारण ती फूट पाडणारी आणि भेदभाव करणारी आहे. सीएबी / सीएए २०१९ ने सर्वोच्च न्यायालयाने १९७३च्या केशवानंद भारती प्रकरणात प्रस्थापित केलेल्या घटनेच्या पायाभूत आराखड्याचे उल्लंघन केले आहे. या खटल्याने भारतीय प्रजासत्ताकाचा पाया म्हणून भारतीय राज्यघटनेचे सर्वश्रेष्ठत्व प्रस्थापित केले आणि घटनेतील प्रस्तावनेतील समानतेच्या (दर्जाची आणि संधीची) आणि न्यायाच्या (सामाजिक, आर्थिक आणि राजकीय) तत्त्वांचे महत्त्व अधोरेखित केले. (स्थिती आणि संधी). धर्मनिरपेक्षता, समानता आणि भेदभाव न करणे ही मूलभूत मूल्ये भारताचे असे घटनात्मक आदर्श आणि आकांक्षा आहेत ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा दिली.

सीएबी / सीएए, २०१९ हे घटनेतील धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांच्या विरोधात आहेच शिवाय कलम १३, १४, १५, १६ आणि २१ चे उल्लंघन करते आहेत जी कायद्याने समानतेच्या हक्काची

आणि भारतीय राज्याद्वारे भेदभाव न करता कायद्यासमोर समान वागणूक दिली जाण्याची हमी देतात. जरी १९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीने धर्मनिरपेक्ष शब्दाची भर घातली गेली असली, तरी सर्वोच्च न्यायालयाने दोनवेळा (केशवानंद भारती प्रकरण, १९७३ आणि एसआर बोम्माई प्रकरण, १९९४) स्पष्टपणे संगितले आहे की या घटनादुरुस्तीपूर्वीही घटनेचा गाभा, त्याची प्रस्तावना आणि मूलभूत हक्क हे ठामपणे धर्मनिरपेक्ष स्वरूपाचेच होते.

सीएबी / सीएए २०१९ नुसार - सरकारने काहीही सूचित केले असले तरीही - हिंदी, मराठी, गुजराती किंवा तामिळ भाषिक असलेल्या हिंदूंना नागरिकत्व दिले जाऊ शकत नाहीत किंवा जाणार नाही कारण असे लोक पाकिस्तान, अफगाणिस्तान किंवा बांगलादेशमधून स्थलांतरित झाले असल्याचे कसे समर्थन करता येईल ?

## सीएबी 2019 बाबतीत काही सामान्य प्रश्न

### भारतात स्थलांतर केलेल्या मुस्लिमांवर या विधेयकाचे काय परिणाम होतील?

या विधेयकाच्या परिणामामुळे किंवा अन्वयार्थाने, नैसर्गिकीकरणाद्वारे भारतीय नागरिकत्व मिळवू पाहणारे सर्व मुस्लिम (स्थलांतरित / शरणार्थी म्हणून १२ वर्षांच्या निवासानंतर आतापर्यंत केलेले अर्ज) हक्काने नागरिकत्व मिळवण्यास पात्र नसतील. फक्त हेच स्वेच्छाधीन असेल. सध्या भारतात वास्तव्य करणारे हजारो अफगाण शरणार्थी तसेच रोहिंग्या यांना याचा थेट धोका निर्माण होऊ शकतो. परिणामी ओढवू शकणारी राज्यहीन अवस्था हे गंभीर चिंतेचे कारण आहे कारण त्यानंतर त्यांचे भवितव्य ते सध्या वास्तव्य करत असलेल्या "शरणार्थी" किंवा "संक्रमण" शिबिरांमध्ये न जाता अटक छावण्यांमध्ये जाण्याची शक्यता आहे. या अटकाव छावण्यांमधील अत्यंत वाईट परिस्थिती आणि त्यांच्या कामकाजातील अपारदर्शकता याबाबत जितके गंभीर प्रश्न आहेत तितकाच त्यांचा कायदेशीर आधारही वादग्रस्त आहे.

### कट ऑफ तारीख 31 डिसेंबर 2014 ही का ठरवली गेली आहे?

या कट ऑफ तारखेबाबत सरकारने कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. कट ऑफ म्हणून ही तारीख ठेवावी अशी कोणतीही घटना किंवा घटना घडलेली नाही, ही केवळ एक मनमानी आहे.

### या विधेयकानुसार नागरिकत्वाचा दावा करू शकणार नाहीत अशा लोकांचे काय होईल?

प्रस्तावित कायद्यात याचे परिणाम स्पष्ट करण्यात आलेले नाहीत परंतु आसाममधील परिस्थिती उदाहरणादाखल घेतल्यास असे नक्कीच अनुमान काढता येईल की अशा व्यक्तींना त्यांचे अगदी मूलभूत हक्कही हिरावून घेऊन अटक छावण्यांमध्ये डांबले जाईल, ज्याची तयारी याआधीच

महाराष्ट्र, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल यांसारख्या राज्यात सुरू झाली आहे.

**कायद्यात दुरुस्ती करण्याचे प्रस्ताव हे अचानक उचललेले पाऊल आहे काय?**

नाही. २०१९च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठीच्या भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यात सीएबी / सीएए २०१९ पुन्हा समाविष्ट केले होते. २०१४ च्या भाजपच्या जाहीरनाम्यात उद्धटपणे म्हटले आहे की "छळल्या गेलेल्या हिंदूंसाठी भारत एक स्वाभाविक घर राहील आणि येथे आश्रय घेण्यास त्यांचे स्वागत असेल."

मोदी सरकारने २०१४ मध्ये सत्तेत आल्यापासूनच नागरिकत्व दुरुस्ती विधेयकाची पूर्वतयारी सुरू केली होती; कारण २०१५ आणि २०१६ मध्ये परदेशी नागरिक आदेश १९४८ मध्ये आणि पासपोर्ट (भारतात प्रवेश) नियम, १९५० मध्ये खालील सुधारणा करण्यात आल्या.

परदेशी नागरिक आदेश १९४८ मध्ये, खालीलप्रमाणे तरतूद समाविष्ट करण्यात आली:

> "3a. परदेशी नागरिकांच्या विशिष्ट वर्गाला सूट.- (i) बांगलादेश आणि पाकिस्तान या देशातील अल्पसंख्यांक समुदायातील व्यक्ती म्हणजे हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन ज्यांना धार्मिक छळामुळे किंवा धार्मिक छळ होण्याच्या भीतीमुळे भारतात आश्रय घेणे भाग पडले होते आणि ज्यांनी भारतात ३१ डिसेंबर २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी प्रवेश केला."

पासपोर्ट (भारतात प्रवेश) नियम, १९५० मध्ये, खालीलप्रमाणे तरतूद समाविष्ट करण्यात आली:

> "(ha) बांगलादेश आणि पाकिस्तान या देशातील अल्पसंख्यांक समुदायातील व्यक्ती म्हणजे हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन ज्यांना धार्मिक छळामुळे किंवा धार्मिक छळ होण्याच्या भीतीमुळे भारतात आश्रय घेणे भाग पडले होते आणि ज्यांनी भारतात ३१ डिसेंबर २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी प्रवेश केला (i) पासपोर्ट किंवा प्रवासासाठी लागणाऱ्या इतर दस्तावेजांसह कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय; किंवा (ii) पासपोर्ट किंवा प्रवासासाठी लागणाऱ्या इतर कागदपत्रांसह कोणत्याही वैध दस्तावेजांसह आणि त्यापैकी कोणतेही कागदपत्र कालबाह्य झाले आहे: अधिकृत राजपत्रात ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून या कलमाची तरतूद अमलात येईल."

२०१६ मध्ये, वरील नियमात अफगाणिस्तानचा समावेश करण्यासाठी सुधारणा करण्यात आली.

**आसाममध्ये नुकत्याच पार पडलेल्या एनआरसीवर नागरिकत्व दुरुस्ती विधेयकाचा काय परिणाम होणार आहे?**

कलम ६ (बी) च्या पोटकलम (३) मध्ये अशीही तरतूद आहे की बेकायदेशीर स्थलांतर किंवा नागरिकत्व यासंदर्भात या कलमांतर्गत एखाद्या व्यक्तीविरूद्ध प्रलंबित असलेली कोणतीही कार्यवाही त्याला नागरिकत्व मिळाल्यापासून रद्दबातल मानली जाईल.

म्हणूनच, एनआरसीमधून वगळलेले १९ लाख लोकांपैकी आसामच्या गैर-आदिवासी भागातील (घटनेच्या ६ व्या अनुसूचीमध्ये समाविष्ट नसलेले क्षेत्र) सर्व गैर मुस्लिमांना या कायद्यानुसार नागरिकत्व मिळू शकते. याचा अर्थ असा होईल की एनआरसीमधून बाहेर ठेवल्या गेलेल्या लोकांपैकी हिंदू कोण आणि मुस्लिम कोण असा निर्लज्जपणे फरक आसाम सरकारला करावा लागेल.

मात्र, त्यांचे कायदेशीर अस्तित्व आता सुधारित कलमांनुसार असणार आहे, त्यानुसार त्यांना, जरी ते कित्येक दशके किंवा त्याहून अधिक काळ राज्यात राहत असलेले बंगाली हिंदू असले तरीही ते 'छळ झालेले अल्पसंख्याक' आहेत जे डिसेंबर २०१४ च्या आधी भारतात आले आहेत, असा *प्रतिज्ञापत्रानुसार* दावा करावा लागेल! हा कायदा हिंदू आणि इतर धर्मांनासाठीदेखील एनआरसी प्रक्रियेच्या अगदी उलट सिद्ध होण्याची शक्यता आहे. परदेशी नागरिक न्यायाधिकरणांमध्ये हे लोक आपण भारतीय नागरिक आहोत हे सिद्ध करण्यासाठी संघर्ष करत आले आहेत परंतु आता नवीन कायद्याचा भर " छळ झालेल्या धार्मिक अल्पसंख्याकांवर"असल्याने नागरिकत्वाचा दावा करण्यासाठी त्यांना आता हे सिद्ध करावे लागेल की त्यांचा केवळ छळच झालेला नाही तर या तीनपैकी एका देशातून आले आहेत!

## आसाममधील मुस्लिमांसाठी याचा काय अर्थ होतो?

राज्याच्या बिगर-आदिवासी भागातील ज्या मुस्लिमांना एनआरसीमधून वगळण्यात आले आहे आणि ते जर परदेशी नागरिक न्यायाधिकरणांसमोर (किंवा उच्च न्यायालयांमध्ये) त्यांचे नागरिकत्व सिद्ध करण्यास असमर्थ ठरले तर त्यांना ताबडतोब अटक छावण्यांमध्ये पाठवले जाऊ शकते.

## भारतीय कायद्यात भेदभावाचा समावेश

भारत प्रथमच आपल्या नागरिकत्व कायद्यात, भेदभावावर आधारीत असा नागरिकत्वाचा हक्क आणत आहे. अशी भीती व्यक्त केली जात आहे की हेरफेर व गैर-अर्थ लावल्याने, या मूलभूतपणे आणि कायद्याद्वारे वगळल्या जाण्याचा, अशा भारतीय मुस्लिमांवरदेखील परिणाम होऊ शकेल जे कधीही स्थलांतरित झाले नाहीत, ते पिढ्यापिढ्या येथेच वास्तव्यास आहेत, परंतु त्यांना अशी अनेक कागदपत्रे सादर करायला भाग पाडले जाईल जी कागदपत्रे आजपर्यंत ४० टक्क्यांपेक्षा जास्त भारतीयांकडे उपलब्ध नाहीत ४०% पेक्षा जास्त कागदपत्रे उपलब्ध नाहीत. (विशेषतः जर

आणि जेव्हा एनपीआर-एनआरसी प्रक्रिया सुरू झाल्यास)

### सध्याच्या नागरिकत्व कायदा 1955 नुसार कोण बेकायदेशीर स्थलांतरित आहेत?

कायद्याने बेकायदेशीर स्थलांतरिताची व्याख्या केली आहे की असा परदेशी नागरिक ज्याने वैध पासपोर्ट किंवा प्रवासी कागदपत्रांशिवाय भारतात प्रवेश केला आहे किंवा अशा वैध कागदपत्रांसह प्रवेश केला असेल परंतु त्यांची मुदत संपल्यानंतरही तो इथेच थांबला.

### नागरिकत्व सुधारणा कायदा, 2019 बेकायदेशीर स्थलांतरितांविषयी काय म्हणतो?

या कायद्यात अशी तरतूद करण्यात आली आहे की, अफगाणिस्तान, बांगलादेश किंवा पाकिस्तानमधून आलेले हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी किंवा ख्रिश्चन समुदायातील सर्व अवैध स्थलांतरित ज्यांनी ३१ डिसेंबर २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी भारतात प्रवेश केला आहे, त्यांना बेकायदेशीर स्थलांतरित मानले जाणार नाही.

### याचा अर्थ असा आहे का की केवळ मुस्लिम समुदायामधील स्थलांतरितांना बेकायदेशीर स्थलांतरित म्हणून ठरवले जाईल?

परिणामस्वरूप तरी होय. असे सर्व "बेकायदेशीर स्थलांतरित" किंवा वैध प्रवासी कागदपत्रे नसलेले परदेशी लोक जे हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी किंवा ख्रिश्चन समुदायाचे नसतील त्यांना बेकायदेशीर स्थलांतरित मानले जातील.

### सीएबी / सीएए 2019 काय करते?

आजवर इतर कोणत्याही कायद्याने केले नाहीत अशाप्रकारे "अन्य" घटक हा कायदा तयार करतो. हे म्हणजे भारतातील मुस्लिमांना स्पष्टपणे सांगणे आहे की ते कधीही निष्ठेच्या कसोटीवर पात्र ठरणार नाहीत. हे सत्य आहे की फक्त त्यांच्याचसाठी आधीच असंख्य मार्गांनी निष्ठेच्या चाचण्या अस्तित्वात आहेत. परंतु आता असा एक कायदाच त्यांना सांगतो की ते कधीही या चाचण्या उत्तीर्ण होणार नाहीत, आणि या वस्तुस्थितीसह त्यांना कायमचे जगावे लागणार आहे.

## सीएबी / सीएए 2019 चे समर्थन करणाऱ्यांचे खंडन

(A) "यामुळे दक्षिण आशियातील छळ होत असलेल्या अल्पसंख्यांकांचा फायदाच होईल" - खोटं. श्रीलंकेतील तमिळ किंवा नेपाळमधील मुस्लिम किंवा इतर अल्पसंख्याकांना यात असे कोणतेही संरक्षण दिलेले नाही. भारतसह सर्वत्र बहुसंख्याकांच्या पक्षपाती धोरणांमुळे अल्पसंख्याकांचा नेहमीच छळ केला जाईल हेच यात पुन्हा अधोरेखित केले आहे.

(B) "नागरिकत्व कायद्याच्या कलम ७ नुसार मुस्लिमांना नॅचरलायझेशन द्वारे नागरिकत्त्व अजूनही शक्य आहे." आधी (A) पहा. छळ झालेल्यांना मदत करण्यासाठी यात काहीही केलेले नाही. तसे असते तर धर्माच्या आधारावर भेदभाव करून मुस्लिमांना बाहेर ठेवलेच नसते. बलूच, बाल्टी, सिंधी, अहमादियांचा छळ होत नाही का? रोहिंग्यांचा छळ होत नाही का? महिलांचा छळ होत नाही का? समाजाच्या कोणत्या घटकांचा नेहमीच छळ होत राहील याला काही अंत नाही. म्हणूनच, छळ हे निमित्त वापरुन सीएबी / सीएए २०१९ चे समर्थन करणे हा ढोंगीपणा आहे.

## ईशान्य भारतासाठी अपवाद

ईशान्येतील सात राज्यांमध्ये सीएबी / सीएएला होत असलेल्या कडक व संतप्त विरोधाच्या समस्येवर त्वरित तोडगा काढण्याचा प्रयत्न म्हणून केंद्र सरकारने त्यांना शांत करण्यासाठी अर्जामध्ये काही अपवाद केले आहेत. हे अपवाद क्लिष्ट आहेत आणि या माहितीपुस्तिकेत त्यांचा समावेश केलेला नाही. फक्त मणिपूर सोडून जिथे परिस्थिती तुलनात्मक दृष्ट्या शांत आहे (कारण ते दुरुस्ती विधेयकातून वगळले आहे), आसाम त्रिपुरा आणि इतर राज्यांमध्ये याला तीव्र आणि संतप्त विरोध प्रदर्शन होत आहेत मात्र आस्थाशून्य सरकार त्यांना दडपण्याचा प्रयत्न करत आहे. लष्कराला देखील पाचारण करण्यात आले आहे आणि निमलष्करी लष्करी व पोलीस दल शांततामयरीत्या विरोध करणाऱ्यांवर जुलूम करत असल्याच्या बातम्या एव्हाना येऊ लागल्या आहेत. तिकडची माहिती उर्वरित भारतापर्यंत पोहोचूच नये यासाठी सरकार माहिती व प्रसारण रोखण्याचा सर्व प्रयत्न करत आहे.

## भारत आणि त्याचे निर्वासित

आजच्या घडीला भारतात मोठ्या संख्येने शेजारच्या देशांतील शरणार्थी आहेत, आणि हे मुख्यत: राजकीय शरणार्थी आहेत, त्यांचा धर्म केवळ एक प्रासंगिक मुद्दा असून तो भारतात आश्रय घेण्याचे त्यांचे मुख्य किंवा महत्वाचे कारण नाही- तिबेटी लोक धर्माच्या नव्हे तर राजकीय कारणांमुळे येथे आहेत; त्याचप्रमाणे श्रीलंकेतील तामिळ लोकसुद्धा.

## भारताच्या शेजारी देशांमधील अल्पसंख्यांक

बांगलादेशाच्या १९७२ च्या राज्यघटनेत सर्व धर्मांना समान हक्क आणि कायद्याच्या समान संरक्षणाची हमी दिली आहे आणि राज्याचा अधिकृत धर्म इस्लाम असला तरी, २०१० मध्ये बांगलादेश उच्च न्यायालयाने सांगितले की सर्व धार्मिक गट आणि भिन्न धर्मांचे अनुयायी यांना समान वागणूक देणे हे त्यांच्या राज्यघटनेसाठी मूलभूत आहे;

इस्लामिक राष्ट्रांमध्ये हिंदूंसारख्या अल्पसंख्याकांवर अत्याचार केला जातो असे जरी मानले जात

असले तरी, सत्य हे आहे की इस्लाम हा काही एकसंध धर्म नाही, आणि प्रबळ इस्लामिक पंथ इतर इस्लामिक पंथांचा तसेच सर्वसाधारणपणे मुस्लिम स्त्रियांचा छळ अल्पसंख्याकांपेक्षा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करतात. याच कारणामुळे, पाकिस्तानमध्ये शिया धार्मिक स्थळांवर हल्ले केले जातात आणि शिया उपासकांवर बॉम्बहल्ले केले जातात, पाकिस्तानात तसेच बांगलादेशमध्ये अहमदियांचा छळ केला जातो, आणि सर्व इस्लामिक राष्ट्रांमध्ये बहाइंना धर्मभ्रष्ट व काफिर मानले जाते;

अगदी बौद्ध लोक सुद्धा हिंसक बनू शकतात, जसे की म्यानमारमध्ये त्यांनी धर्माच्या नव्हे वांशिक उत्पत्तीच्या आधारे रोहिंग्यांचा वंशविच्छेद चालवला आहे.

## भारताला खोल खड्ड्यात ढकलले जात आहे, जिथून परतीला वाव नाही

सीएबी/सीएए २०१९, आता भारताला आणखीनच प्रचंड खोल खड्ड्यात ढकलणार आहे. ईशान्य भारतात ज्या लोकांनी एनआरसीचे स्वागत केले होते तेच आता सीएएचा विरोध करत आहेत कारण त्यांना माहीत आहे की ज्या ज्या कारणांसाठी त्यांनी एनआरसीचे समर्थन केले होते ती सर्व आता त्यांच्यावरच उलटू शकतात. ते एका विशिष्ट गटाला परके ठरवायला निघाले होते, मात्र आता स्वतःच स्वतःच्या जाळ्यात फसले आहेत. म्हणूनच जे लोक आत्ता सीएए २०१९ चे समर्थन करत आहेत, त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की ते स्वतःच स्वतःसाठी सापळा रचत आहेत. ज्यात तुम्ही लवकरच अडकू शकता किंवा अडकणार आहात.

आणि अखेरीस प्रत्येकजण, प्रत्येकाचा द्वेष करायला लागेल किंवा करू शकतो. आधी तुम्हाला आसाममधून बंगाली लोकांना हाकलायचे होते. आता तुमची इच्छा आहे की हिंदूंनी रहावे पण मुस्लिमांनी निघून जावे. पण थांबा. काही लोकांना हिंदूंनी सुद्धा रहावे असे वाटत नाही. म्हणून मग, इतर सर्व ठिकाणचे हिंदू आसामच्या हिंदूंचा किंवा ईशान्येकडील इतर आदिवासींचा द्वेष करायला लागतील. नंतर, सीएए २०१९ मध्ये मिळालेल्या विजयाने गर्व चढलेले उर्वरित भारतातील उच्च जातींचे विशेष वर्गातील लोक बहुजनांवर त्यांचा विशेषाधिकार कायम ठेवण्यासाठी नवीन अटींची अपेक्षा करतील. दरम्यान, विशेष वर्गातील बहुसंख्यांक लोकांकडून मुस्लिमांचा द्वेष सुरूच राहील.

एक राजकीय पक्ष हे सर्व फक्त एकाच हेतूने करत आहे. त्यांची राजकीय सत्ता कायमस्वरुपी टिकवून ठेवणे, आणि भारताच्या फक्त एका वर्गाला मतदानापासून वंचित ठेवणे. त्यांना माहीत आहे की द्वेष ही एक शक्तिशाली भावना आहे. सुरुवातीला ती काही लोकांना जखडते. पण जसजशी ती वाढत जाते तशी ती सर्वांनाच गिळंकृत करते आणि अखेरीस मागे काहीच शिल्लक राहत नाही.

अगदी भारताची संकल्पनाही शिल्लक राहत नाही.

## एनपीआर, एनआरसी समजून घ्या

एखाद्या व्यक्तीच्या मानवी हक्कांवर थेट परिणाम करू शकतील असे पैलू विचारात घेता, सध्या आसाममध्ये राबवली जात असलेली आणि देशाच्या इतर भागांतही लागू केली जाण्याची शक्यता असलेली राष्ट्रीय नागरिक नोंदणी प्रक्रिया राजकीय कायदेशीर आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीसह समजून घेणे गरजेचे आहे.

- **भाग एक: संपूर्ण भारत आणि आसाम:** नागरिकत्व म्हणजे काय?
- **भाग दोन: आसाम:** एनआरसी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेची अंमलबजावणी करणारे एकमेव राज्य असलेल्या आसामचा याबाबतीतला काय अनुभव काय सांगतो?
- **भाग तीन: संपूर्ण भारत:** राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (एनपीआर) म्हणजे काय, जिची गणती एप्रिल २०२० मध्ये सुरू होईल आणि सप्टेंबर २०२० मध्ये पूर्ण होईल?
- **भाग चार: संपूर्ण भारत:** राष्ट्रीय नागरिक नोंदणी म्हणजे काय आणि तिला काय कायदेशीर आधार आहे? राष्ट्रव्यापी एनआरसीचा भारतीयांसाठी काय अर्थ होतो?
- **भाग पाच: प्रस्तावित कृती:** एनपीआरची गणना झाल्यानंतर उद्भवणाऱ्या पैलूंबाबत स्पष्टतेची आणि चर्चा करण्याची ठामपणे मागणी सर्वच भारतीयांनी आणि विरोधक राजकीय पक्षांनी करायला नको का? एनपीआर प्रक्रिया अपरिहार्यपणे भारतव्यापी एनआरसीकडे जाते का?

या प्रश्नांची उत्तरे या माहितीपत्रकातून देण्याचा प्रयत्न केला आहे. सिटीझन फॉर जस्टिस अँड पीस गेल्या तीन वर्षांमध्ये आसाममधील या संकटाशी सामना करण्यात आघाडीवर राहिली आहे. आमच्या या कामांचा तपशील या माहितीपत्रकाच्या शेवटी दिलेला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून, 'राष्ट्रव्यापी' एनआरसीच्या शक्यतेने घबराट निर्माण झाली असल्यामुळे सीजेपीला कोलकाता (बंगाल), मालेगाव, भिवंडी, पुणे (महाराष्ट्र), हैदराबाद (तेलंगणा), पुरी (ओडिशा) येथे बैठकांना संबोधित करण्यासाठी आणि नागरिकांना या मुद्द्याबाबत प्रशिक्षण आणि माहिती देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. घटनात्मक पदावरील राजकारण्यांची अनावश्यक आक्रमक विधाने तसेच कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यांनी "अवैध स्थलांतरितांच्या" विरोधात हाती घेतलेल्या अपारदर्शक उपाययोजना तसेच अटक छावण्यांची सुद्धा उभारणी यांचा फायदा

झालेला नाही. कायदेशीर आणि घटनात्मक जागरूकता हा मानवी हक्कांच्या सर्व प्रश्नांचा गाभा आहे, नागरिकत्व हा त्यापैकीच एक हक्क आहे, या विश्वासाने हे माहितीपत्रक प्रकाशित करत आहोत. सध्या चालू असलेल्या प्रक्रियांविषयी आपल्यापैकी प्रत्येकाने माहिती करून घेणे आणि सुसज्ज असणे आवश्यक आहे जेणेकरून आपण आपल्या मूलभूत अधिकारांची अंमलबजावणी करायला लावण्यासाठी तयार राहू.

**प्रशिक्षणासाठी आमच्याशी संपर्क साधा info@cjp.org.in**

## नागरिकत्व म्हणजे काय?

### संपूर्ण भारत आणि आसाम:

**नागरिकांचे हक्क:** मतदानाच्या हक्काव्यतिरिक्त, नागरिकांना समानता, अभिव्यक्तीस्वातंत्र्य, समभाव, सभा भरविण्याचे स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य इत्यादी विविध मूलभूत अधिकार असण्याचा हक्क आहे. त्यांना कायमस्वरूपी भारतात रहाण्याचा हक्क आहे, परदेशी लोकांना हा अधिकार नाही. नागरिकांना मत देण्याचा अधिकार आहे. आपल्या लोकशाहीचे धोरण आपल्या लोकांचे हित लक्षात घेऊन तयार केले गेले आहे. देशातील बहुतेक सर्व कल्याणकारी योजना फक्त नागरिकांसाठी असतात.

**परदेशी नागरिकांना** केवळ जीवनाच्या मूलभूत अधिकाराचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार आहे. १९५१ चे युनायटेड नेशन्स रेफ्यूजी कन्व्हेन्शन आणि १९६७ चा प्रोटोकॉल स्वतःच्या देशात छळ झालेल्या परदेशातील शरणार्थींना संरक्षण प्रदान करतात; पण या दोन्हीमध्ये भारत स्वाक्षरीकर्ता नाही. याशिवाय, भारत राजकीय आश्रयाला परवानगी देत नाही. तथापि, यापूर्वी भारताने काही अपवाद केले आहेत जसे की, परदेशी नागरिक नोंदणी अधिनियमांतर्गत तिबेटी नागरिकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे.

**अगदी सोप्या शब्दात पुन्हा सांगायचे तर, नागरिकत्वामुळे काही अधिकार असण्याचा हक्क आपल्याला मिळतो. भारतीय राज्यघटनेने भाग 2 मध्ये नागरिकत्व समाविष्ट केले आहे, यामधील कलम 11 मध्ये भविष्याबद्दल भाष्य केले आहे आणि नागरिकत्वासंबंधी कायदे करण्याची परवानगी संसदेला दिलेली आहे. भारतीय राज्यघटनेच्या 5 ते 11 या कलमांतर्गत नागरिकत्वासंबंधी चर्चा केली आहे.**




*ऑश्विट्झ छळ छावणी, जिथे १९४०-१९४५ दरम्यान अंदाजे ११ लाख कैद्यांना ठार मारले गेले. जर्मन भाषेत लिहिले आहे - वर्क सेट्स यु फ्री*

१९६३ साली हॅना आरेण्ट, या राजकीय विचारवंत आणि कार्यकर्तीने म्हटले आहे की, ती "दुष्टपणाचे स्वरूप यावर अनेक वर्षांपासून म्हणजे तीस वर्षांपासून विचार करत होती."आरेण्ट स्वतःसुद्धा छळ छावणीतून सुटून अखेरीस अमेरिकेत दाखल झालेल्या एक जर्मन ज्यू होत्या आणि त्यांच्यासाठी हिटलरच्या नाझी जर्मनीतील त्या छावण्या म्हणजे मूलगामी दुष्टपणाचे दृश्यरूप होते, ज्यांनी निरंकुश सत्तेचे सार प्रकट केले. अशी छावणी म्हणजे हुकूमशाही राज्यांमधील एक महत्त्वाचा घटक होता. कोणत्याही गुन्ह्यात दोषी नसले तरीही अटक केलेल्यांना छळ छावण्यांमध्ये किंवा नुकत्याच स्थापन केलेल्या गेस्टेच्या तळघरांमध्ये नेण्यात येई आणि आरेण्टच्या भाषेत सांगायचे तर त्याचा "राक्षसी" छळ करण्यात येत असे. २१व्या शतकातल्या भारतातील अटक छावण्या किंवा केंद्रे सुद्धा तशीच असतील का?

जर्मनीच्या न्याय मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, नाझी जर्मनीने कब्जा केलेल्या देशांमध्ये सुमारे १२०० छावण्या आणि उप-छावण्या चालवल्या जात होत्या, तर ज्यू व्हर्च्युअल लायब्ररीच्या अंदाजानुसार संपूर्ण नाझीव्याप्त युरोपमधील नाझी छावण्यांची संख्या जवळपास १५,००० होती. या छावण्यांमध्ये उपासमार व अत्याचारानंतर जवळजवळ तीस लाख ज्यूंनाच ठार मारण्यात आले नव्हते तर कोणत्याही स्वरूपाचा विरोध केल्याबद्दल विशेष न्यायालये, कोर्ट मार्शल आणि नागरी

न्याय व्यवस्था यांच्यामार्फत ७७,००० जर्मन लोकांनाही नाझींनी ठार मारले. बुकेनवाल्डमधील सुरुवातीच्या छावण्यांनी उद्योगांमध्ये काबाडकष्ट करण्यासाठी या कैद्यांचा वापर केला जात असे. ऑश्विट्झ, रेवेन्सब्रुक आणि बर्गन बेलसन या छावण्यांमधील भयंकर अत्याचार तर सर्वश्रुतच आहेत.

मात्र, हे काही फक्त जर्मनीतच घडलेले नाही. जगभरातील छळ छावण्यांचा इतिहास अंगावर काटा आणणारा आहे. "छळ छावण्या" या शब्दांनाच जणूकाही विध्वंसाची अशुभ छटा आहे, त्या कोणत्याही चौकशीच्या कक्षेबाहेर असलेल्या नजरकैद किंवा अटक छावण्या असतात जिथे क्रूरपणाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या गेल्या आहेत. क्युबामध्ये जनरल वेलवरने "रिकन्सन्ट्रेशन कॅम्प्स" (छळ छावण्या) उभारले होते. अमेरिकन सरकारनेसुद्धा मूळच्या अमेरिकन लोकांविरुद्ध यापूर्वी छळ छावण्यांचा वापर केला आहे आणि दक्षिण आफ्रिकेतील दुसऱ्या बोअर युद्धाच्या वेळी ब्रिटिशांनीही त्यांचा वापर केला होता. १९०४ ते १९०८ च्या दरम्यान शाही जर्मन सैन्याने आधुनिक काळातील नामिबियात छळ छावण्या चालवल्या होत्या ज्या दरम्यान हेरेरो व नामाक्वा लोकांचा प्रचंड प्रमाणात वंशविच्छेद झाला.

**'वंश आणि त्याची संस्कृती शुद्ध राखण्यासाठी सेमेटिक वंशाच्या लोकांना म्हणजेच ज्यूंचा देशातून हाकलून लावून जर्मनीने जगाला धक्का दिला. यात वंशाबद्दलचा सर्वोच्च अभिमान दिसून येतो. मुळातूनच वेगवेगळे असलेले वंश आणि संस्कृती एकजीव होऊन नांदणे कसे अशक्य आहे हेही जर्मनीने दाखवून दिले आहे. यातून आपल्या हिंदुस्थानाने शिकले पाहिजे आणि त्याचा फायदा करून घेतला पाहिजे.'**

**- एमएस गोळवलकर यांनी वी ऑर अवर नेशनहूड डिफाइन्ड यामध्ये लिहिले आहे, (1939 मध्ये प्रकाशित)**

मानवी इतिहासात आळीपाळीने आपल्याला वर्चस्व, छळ आणि कल्पनातीत क्रौर्य यांचे दर्शन घडले आहे. सध्या लादण्यात आलेल्या नागरिकत्व संकटामुळे भारत ज्या गोष्टीला सामोरा जात आहे ते पाहता या नरसंहारांची (होलोकॉस्ट्स) आठवण होणे उचितच आहे.

**कलम 5 ते 10** मध्ये, राज्यघटनेच्या अंमलबजावणीच्या वेळेस म्हणजे **26.1.1950** ला असलेल्या नागरिकत्वाच्या स्थितीसंबंधी मजकूर आहे. नागरिकत्व हे मूलतः जन्माद्वारे मिळते; परंतु त्याबरोबरच स्थलांतराबद्दल काही तरतुदी आहेत. पण हे सद्यस्थितीतील आपल्या उद्दीष्टांसाठी फारसे संबंधित नाही, कारण घटनेच्या अंमलबजावणीच्या वेळीच यातील गोष्टी निश्चित करण्यात आल्या होत्या.

**कलम 11** भविष्यातील तरतुदींविषयी असून ते नागरिकत्वासंबंधी कायदे करण्याची संसदेला परवानगी देते.

## संपूर्ण भारत

**नागरिकत्व कायदा 1955** अंतर्गत नागरिकत्व मिळवण्याच्या ५ पद्धती आहेत:

अ) जन्माद्वारे

ब) अनुवांशिकता (भारतीय नागरिक असलेल्या आई-वडिलांची भारताबाहेर जन्मलेली अपत्ये)

क) नोंदणीद्वारे

ड) स्वीकृतिकरण (साधारणपणे बारा वर्षे कालावधीपासून भारतात राहणारे)

इ) भूप्रदेश सामीलीकरण (उदा. सिक्कीम)

जर भारतात जन्म झाला नसेल तर नागरिकत्व मिळवण्याचे प्रमुख मार्ग म्हणजे स्वीकृतिकरण किंवा नोंदणी. मात्र, या दोन्ही पद्धती **'अवैध स्थलांतरितांना'** उपलब्ध नाहीत.

नागरिकत्व कायद्यांतर्गत अवैध स्थलांतरित व्यक्तीची व्याख्या अशी केली गेली आहे की, अशा कोणत्याही व्यक्ती ज्यांनी वैध पासपोर्ट किंवा प्रवासी कागदपत्रांशिवाय भारतात प्रवेश केला आहे, किंवा वैध पासपोर्ट किंवा प्रवासी कागदपत्रासह भारतात प्रवेश केला होता परंतु या कागदपत्रांची मुदत संपल्यानंतर सुद्धा ते भारतातच राहिले (कलम २ (१) (बी)). उदाहरणार्थ, असा बांगलादेशी ज्यावर पासपोर्ट किंवा वैध प्रवासाच्या कागदपत्रांशिवाय भारतात प्रवेश करण्याचा आरोप आहे, तो कधीही भारतीय नागरिकत्व मिळवू शकत नाही (विशिष्ट परिस्थितीत वगळता, जसे की २५ मार्च १९७१ पूर्वी त्याचा आसाममध्ये प्रवेश झाला असेल तर).

जन्माद्वारे मिळालेल्या नागरिकत्वाचा विचार करता, त्यात नंतर काही दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.

**1987 पूर्वी:** १ जुलै, १९८७ पूर्वी भारतात जन्मलेली कोणतीही व्यक्ती आपोआप भारतीय नागरिकत्व मिळण्यास पात्र आहे; त्या व्यक्तीचे पालक कोणीही असले किंवा ते कोठेही जन्मलेले असले किंवा जरी ते बेकायदेशीर स्थलांतरित असले तरीही. १ जुलै, १९८७ ते ३ डिसेंबर, २००४ दरम्यान भारतात जन्मलेल्या व्यक्तींसाठी, जर पालकांपैकी एक जण जन्माच्या वेळी भारतीय नागरिक असेल तरच जन्माद्वारे भारतीय नागरिकत्व मिळविण्यास ते पात्र ठरतील.

**1987 - 2004:** डिसेंबर, २००४ नंतर भारतात जन्मलेल्यांना तेव्हाच भारतीय नागरिकत्व मिळू शकेल जेव्हा त्यांचे दोन्ही पालक भारताचे नागरिक असतील किंवा दोघांपैकी एक पालक भारतीय नागरिक असेल आणि दुसरा अवैध स्थलांतरित नसेल.

**2004 नंतर:** ३ डिसेंबर २००४ नंतर जन्माला आलेल्या मुलांना जर पालकांपैकी एकालाही अवैध स्थलांतरित ठरवले गेले असेल तर, अशा प्रकारे, भारताचे नागरिकत्व मिळविण्यास प्रतिबंधित केले जाईल.

**थोडक्यात, आपल्यापैकी ज्यांचा जन्म 1 जुलै 1987 पूर्वी झाला आहे, त्यांना नागरिकत्व मिळविण्यासाठी, आपण भारतात जन्मलो हे सिद्ध करणे पुरेसे आहे. आपल्यापैकी जे 1 जुलै, 1987 ते 3 डिसेंबर 2004 या काळात जन्मले आहेत, त्यांच्यासाठी आपण येथेच जन्मलेले असणे आणि आपल्या आईवडिलांपैकी एकजण आपल्या जन्माच्या वेळी भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे. आपल्यापैकी 3 डिसेंबर 2004 नंतर भारतात जन्मलेल्यांसाठी, आपल्या पालकांपैकी एकजण आपल्या जन्माच्या वेळी भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे परंतु त्याचबरोबरच दुसरा पालक अवैध स्थलांतरित असता कामा नये.**

# आसाम

## आसाममधील नागरिकत्व कायदा

१९७०च्या उत्तरार्धात आणि १९८०च्या पूर्वार्धात झालेल्या आसाम आंदोलनामुळे अवैध स्थलांतर (न्यायाधिकरणांद्वारे निर्धारण) कायदा - १९८३ हा कायदा मंजूर झाला. आसामवर हा कायदा आपोआप लागू झाला असला तरी हा अखिल भारतीय कायदा होता आणि केंद्र सरकारच्या निर्णयानुसार देशातील इतर भागांनाही तो लागू केला जाऊ शकत होता. परंतु, हे कधीच केले गेले नव्हते. या कायद्यानुसार, २५ मार्च १९७१ नंतर पासपोर्ट किंवा इतर वैध प्रवासाच्या कागदपत्रांशिवाय भारतात प्रवेश करणाऱ्या परदेशी व्यक्तीस अवैध स्थलांतरित प्रवासी ठरवले गेले. या कायद्यांतर्गत न्यायाधिकरणांची स्थापना केली जाणार होती. त्यातील एक मुख्य वादाचा मुद्दा हा होता की परदेशी न्यायाधिकरण आदेशातील प्रक्रियेत उलट बदल करत आयएमडीटी कायद्याने नागरिकत्वाचा पुरावा देण्याची जबाबदारी परदेशी असल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीवर ठेवली नाही.

**आयएमडीटी कायदा रद्द केला:** सर्वानंद सोनोवाल (२०१६ मधील मुख्यमंत्री, २०१९ मध्येही मुख्यमंत्री) यांनी या कायद्याला आव्हान दिले होते. मुख्यत्वे करून पुरावा देण्याची जबाबदारी आरोपित परदेशी व्यक्तीवर नसणे, आणि इतर काही कारणांमुळे २००५ मध्ये हा कायदा असंवैधानिक ठरवला गेला. एकदा हा प्रकार घडल्यानंतर केंद्र सरकारने परदेशी व्यक्ती न्यायाधिकरण आदेश (फॉरेनर्स ट्रिब्यूनल ऑर्डर) १९६४ मध्ये बदल करुन म्हटले की हा आदेश आसामला लागू होणार नाही. परदेशी व्यक्ती शोधण्यासाठी आसामने वेगळी न्यायाधिकरणे स्थापन करावीत यासाठी एक स्वतंत्र आदेश जारी केला गेला. यालादेखील सोनोवाल यांनी आव्हान दिले होते आणि २००७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने याही आदेशांना रद्दबातल ठरवले. याचा परिणाम म्हणजे परदेशी व्यक्ती न्यायाधिकरण आदेश १९६४ आता आसामला लागू होतो आणि या आदेशानुसार आसाममध्ये परदेशी व्यक्ती न्यायाधिकरणांची स्थापना केली आहे.

**1985 मध्ये आसाम करारावर** स्वाक्षरी झाली. परिणामी, **1987 मध्ये नागरिकत्व कायदा, 1955** केवळ आसाम करिता कलम ६अ समाविष्ट करण्यासाठी सुधारित करण्यात आला. यानुसार:

अ. आसाम राज्यासाठी, १.१.१९६६ च्या आधी पूर्वीच्या पूर्व-पाकिस्तानातून आलेल्या आणि त्यानंतर आसामचे सामान्य रहिवासी असलेल्या सर्व व्यक्तींना १.१.१९६६ पासूनचे भारताचे नागरिक मानले जाईल.

ब. पूर्वीच्या पूर्व-पाकिस्तानातून १.१.१९६६ ते २५.३.१९७१ दरम्यान आसाममध्ये दाखल झालेले, त्यानंतर तिथेच वास्तव्यास असलेले आणि ज्यांना परदेशी म्हणून संबोधले गेले आहे असे लोक संबंधित प्राधिकरणाकडे नोंदणी करतील. ती व्यक्ती नागरिकत्वाचे सर्व निकष पूर्ण करते असे प्राधिकरणास वाटत असेल तर अशा व्यक्तीची नोंदणी होईल, आणि जर अशा व्यक्तीने निकष पूर्ण केले नाहीत असे वाटत असेल तर ते प्रकरण परदेशी व्यक्ती न्यायाधिकरणाकडे जाईल. अशा व्यक्तीस परदेशी म्हणून ओळखल्यापासून १० वर्षांनंतर भारताचे नागरिक म्हणून मानले जाईल. या कालावधीपर्यंत, त्याला इतर हक्क असतील परंतु मतदानाचा हक्क नसेल. १० वर्षांनंतर त्याला / तिला नागरिकाचे सर्व हक्क असतील.

क. कलम ६अ(७) मध्ये असे म्हटले आहे की, ७.१२.१९८५ पूर्वी भारतीय नागरिक असलेल्या व्यक्तीस या कलमातील काहीही लागू होणार नाही. १९८५ च्या पूर्वी, अखिल भारतीय नागरिकत्व जन्मतःच होते आणि म्हणूनच २५.३.१९७१ नंतर भारतात दाखल झालेल्या बेकायदेशीर स्थलांतरितांनी ७.१२.१९८५ च्या आधी अपत्यास भारतात जन्म दिला असेल, तर अशा अपत्यास भारताचे नागरिक मानले जाईल.

थोडक्यात, या कलमात अशी तरतूद केली गेली आहे की, २५.३.१९७१ नंतर बांगलादेशातून भारतात प्रवेश करणारे भारतीय नागरिकत्व मिळवण्यास पात्र असणार नाहीत.



*अली अकबर*

नुकताच अटकेतून सोडण्यात आलेल्या अली अकबरला आसाम सीमा पोलिसांनी पुन्हा 'परदेशी नागरिक नोटीस' पाठवल्याने त्याला दुहेरी धोक्याचा सामना करावा लागणार आहे! गोआलपारा अटक छावणीत चार वर्षे घालवल्यानंतर २९ नोव्हेंबर, २०१९ रोजी त्याला तात्पुरत्या जामीनावर सोडले खरे पण बोंगाईगाव सीमा पोलिसांकडून आणखी एका 'परदेशी नागरिक नोटीस''चा सामना करण्यासाठी. ज्यामुळे. १० डिसेंबर २०१९ म्हणजेच आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनाच्या दिवशीच त्याला भीतीदायक अशा परदेशी न्यायाधिकरणासमोर हजर राहणे भाग आहे.

# परदेशी नागरिक वादविवाद: आसाम

**जनगणना 1951:** १९५१च्या जनगणनेमध्ये हिंदू ३०६ दशलक्ष (८४.१%) आणि मुसलमान ३४ दशलक्ष (९.८%) होते. (भारताचे स्वातंत्र्य आणि फाळणीनंतरची पहिली जनगणना) १९५१ च्या विस्थापित लोकांच्या जनगणनेनुसार ७२.२६ लाख मुस्लिम भारतातून पाकिस्तानमध्ये (पश्चिम आणि पूर्व दोन्ही) गेले आणि ७२.४९ लाख हिंदू आणि शिख पाकिस्तानातून (पश्चिम आणि पूर्व दोन्ही) भारतात आले.

## "घुसखोरीच्या" बाता विरुद्ध आकडेवारी: आसाम

**'घुसखोर' आणि पीआयपी योजना (1961-1964):** १९६१ च्या जनगणनेवरील त्यांच्या अहवालात जनगणना महानिबंधक यांनी आसाममध्ये २ लाखांहून अधिक 'घुसखोर' दाखल झाले असल्याचे मूल्यांकन केले होते. त्यानंतर पोलिसांनी या 'घुसखोरांना" शोधून काढण्यासाठी आणि परत पाठवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कारवाईला सुरुवात केली. त्यानंतर १९९८ मध्ये, आसामचे राज्यपाल एस. के. सिन्हा यांनी त्यांच्या अहवालात बांगलादेशातून होणाऱ्या बेकायदेशीर स्थलांतरामुळे उद्भवलेला 'गंभीर धोका' अधोरेखित केला असला तरी शैक्षणिक व मानवी हक्क क्षेत्रातील अनेकांनी या वक्तव्याला आकडेवारीचा आधार नसल्याबद्दल प्रश्न उपस्थित केले होते. भारताचे माजी गृहमंत्री इंद्रजित गुप्ता यांची आसाममधील बेकायदेशीर स्थलांतरितांच्या मोठ्या संख्येबाबतची संसदेतील निवेदने सार्वजनिक चर्चाविश्वाला प्रभावित करत राहिली आणि तीसुद्धा व्यापक आकडेवारीवर आधारित नव्हती. हळूहळू १.२ कोटी 'घुसखोर' आहेत यावर भारताचा विश्वास गेला! दरम्यान, भारताच्या सर्वोच्च न्यायालयानेही, सर्वानंद सोनोवाल २००५ आणि २००७ या दोन महत्त्वपूर्ण निकालांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने, "अवैध स्थलांतरा" वरून सुरू असलेल्या उन्मादावर विश्वास ठेवून राष्ट्रीय सुरक्षेला "बाह्य आक्रमणा" पासून असलेल्या धोक्यांचा उल्लेख केला आहे.

जून १९६२ मध्ये, "पाकिस्तानी राष्ट्रांमधून भारतात घुसखोरीला प्रतिबंध" किंवा पीआयपी योजना सुरू करण्यात आली. नव्याने घुसलेल्यांना नजरेस न पडणे अत्यंत अवघड बनवण्याच्या दृष्टीने सीमाभागातील विद्यमान रहिवाशांच्या संख्येवर आणि त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी एक सुरक्षा प्रणाली प्रस्थापित करणे हे या योजनेचे उद्दिष्ट होते. या योजनेंतर्गत सरकारने खालील तीन प्रकारच्या 'घुसखोरांना' तडकाफडकी हद्दपार करण्याचे ठरवले: पाकिस्तानी पासपोर्ट असलेले पाकिस्तानी नागरिक, यापूर्वी हद्दपार करूनही परत घुसखोरी केलेले आणि सीमेवर पकडले गेलेले नवे घुसखोर.

जून १९६४ मध्ये परकीय नागरिक (न्यायाधिकरण) आदेश मंजूर करण्यात आला, ज्याद्वारे

आसाममध्ये राहत असलेल्या संशयित 'परकीयांना' हाकलून लावण्यात मदत करण्यासाठी सुनावणी आयोजित करू शकतील अशी परकीय नागरिक न्यायाधिकरणे स्थापन करण्यात आली. घुसखोरांना आणि परकीयांना भारत सोडण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या आणि एक लाखांहून अधिक लोकांना कोणत्याही खटल्याशिवाय जबरदस्तीने हद्दपार करण्यात आले. १९६५ पासून ठराविक भागांतील भारतीय रहिवाशांना ओळखपत्रे देण्यास सुरुवात झाली, जेणेकरून पाकिस्तानी घुसखोर समजले गेल्यामुळे निर्माण होणारी लज्जास्पद परिस्थिती टाळण्यासाठी ती ते स्वेच्छेने जवळ बाळगू शकतात. आसाम सीमा पोलीस संघटनेचा उदय यामधूनच झाला जी १९७४ पासून स्वतंत्रपणे सीमा संघटना आसाम पोलिसांची एक शाखा म्हणून कार्य करू लागली.

**1979 आसाम आंदोलन:** मंगलदोई लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्यावेळी मोठ्या प्रमाणावर संशयित परकीय नागरिकांचा मतदार याद्यांमध्ये समावेश झाला आहे असे आरोप झाले होते. आसाम आंदोलनाची सुरुवात त्याचवेळी झाली. याचे नेतृत्व आसुकडे (एएएसयु- ऑल आसाम स्टुडंट युनियन) होते.

**1983 नेल्ली हत्याकांड:** उपेक्षित बंगाली मुस्लिमांचे स्वातंत्र्योत्तर भारतातील पहिले वंशविच्छेदक हत्याकांड जे १८ फेब्रुवारी १९८३ रोजी घडले: "बेकायदेशीर स्थलांतरित" या मुद्द्याभोवती निर्माण करण्यात आलेल्या या लक्ष्यित उन्मादात २,५०० निष्पाप लोकांचा बळी गेला. आज २६ वर्षांनंतरही या हत्याकांडाच्या एकाही शक्तिशाली गुन्हेगाराला शिक्षा न मिळाल्यामुळे बचावलेल्यांना न्याय मिळालेला नाही, आणि आता बोरबारी (नेल्ली) या गावाला पुन्हा यातना भोगाव्या लागत आहेत कारण वेगवेगळ्या जातींच्या आणि समुदायांच्या मिळून त्याच्या ४० टक्के रहिवाशांना एनआरसीमधून वगळण्यात आले आहे. या धास्ती निर्माण करणाऱ्या परदेशी नागरिक न्यायाधिकरणांचा सामना नेल्लीच्या रहिवाशांना सुद्धा करावा लागला! सीजेपीचा रिपोर्ट: ३६ वर्षांनंतरही नेल्ली हत्याकांडातून वाचलेल्यांच्या यातना कायम, ४०% एनआरसीमधून बाहेर.

**आसाम करार (1985):** ६ वर्षांच्या प्रदीर्घ आंदोलनानंतर आसाम करारावर सही करण्यात आली. १९८४ मध्ये इंदिरा गांधींची हत्या झाल्यानंतर राजीव गांधींनी पंतप्रधानपदाची सूत्रे सांभाळली. १५ ऑगस्ट १९८५ रोजी या ऐतिहासिक करारावर सह्या करण्यात आल्या. या करारातील कलम ५ मध्ये अशी तरतूद आहे:

१. परदेशी नागरिकांना शोधण्यासाठी आणि काढून टाकण्यासाठी १ जानेवारी १९६६ ही आधारभूत तारीख असेल. जे त्या तारखेच्या आधी आसाममध्ये आले असतील त्यांना नियमित करण्यात येईल.

२. १ जानेवारी १९६६ आणि २४ मार्च १९७१ यादरम्यान जे लोक आसाममध्ये आलेले असतील

त्यांना परदेशी नागरिक कायदा १९४६ आणि परदेशी (न्यायाधिकरण) आदेश १९६४ नुसार शोधण्यात येईल.

## निवडणूक आयोग आणि आसाममधील नागरिकत्व

**डी मतदार:** आसाम करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर आसाम सीमा पोलिसांनी बांगलादेश, पाकिस्तान किंवा अन्य देशांतून आलेले बाहेरचे लोक असल्याचा संशय असलेल्या लोकांना, १९६४ मध्ये संमत केलेल्या कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेल्या परदेशी न्यायाधिकरणांकडे पाठविणे सुरूच ठेवले. तथापि, १९९७ पासून निवडणूक आयोगाने संशयास्पद किंवा संदिग्ध मतदार (डी व्होटर्स) नावाची एक नवीन श्रेणी तयार केली.

१७ जुलै १९९७ रोजी निवडणूक आयोगाने आसाम सरकारला एक परिपत्रक जारी करून मतदार यादीतून गैर-नागरिकांना हटविण्याचे निर्देश दिले. यानंतर मतदारयादी सुधारित करण्यासाठी राज्यभरात मोठ्या प्रमाणात घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले. जे मतदार आपले भारतीयत्व सिद्ध करण्यात अक्षम असल्याचे जाणवले त्यांच्या नावांसमोर मतदार यादीमध्ये 'डी' लिहिले गेले. तसेच अनेक गैरहजर मतदारांच्या नावांसमोरही 'डी' लिहिले गेले.

२०११ च्या जनगणनेनुसार आसाम हे एक असेही राज्य आहे, जेथे ५४ टक्के लोक जन्मापासूनच अंतर्गत स्थलांतरित झालेले आहेत. हे गंभीरपणे पूरग्रस्त झालेले एक राज्य देखीलआहे ज्यामुळे केवळ विस्थापनच होत नाही तर नदीच्या भागातील गावे समूळ 'गायब' झाल्याने पुन्हा नव्याने वसवावी लागतात. पूरातील आपत्ती, उपजीविकेसंबंधीची अनिश्चितता आणि जमिनीची धूप हे अंतर्गत स्थलांतरांचे मुख्य कारण आहे. विस्थापित होणारे बरेच लोक त्यांच्या सामाजिक-आर्थिक भांडवलाचा उपयोग नवीन समुदायात आणि उजाड जमीनींवर पुन्हा स्थिरस्थावर होण्यासाठी करतात ज्यांची त्यांच्याकडे "हक्कपत्रे नसतात".

**सीजेपीने प्रकाशित केलेला शैक्षणिक अभ्यास:** कशाप्रकारे पुरामुळे होणाऱ्या विस्थापनामुळे आसाममधील अशिक्षित आणि निराधार महिला डी-मतदार बनत आहेत आणि 'डी'-मतदारांच्या केंद्रीकरणानुसार बनवलेले विधानसभा मतदारसंघांचे नकाशे यांवरून असे लक्षात येते की, बहुतांश डी-मतदार पुरामुळे सर्वाधिक धूप झालेल्या प्रदेशांजवळील मतदारसंघात राहतात. 'डी' मतदार म्हणून घोषित झालेल्या आणि मतदानाचा हक्क हिरावून घेतल्या गेलेल्यांपैकी ६२ टक्के ही महिला गृहप्रमुख असलेली कुटुंबे आहेत.

आसामचे परिवहन मंत्री चंद्रमोहन पटवारी यांनी २६ मार्च, २०१८ रोजी राज्य विधिमंडळासमोर केलेल्या निवेदनानुसार, ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत एकूण २,४४,१४४ लोकांना 'डी' मतदार

म्हणून ठरवले गेले होते. त्यापैकी १,३१,०३४ प्रकरणे ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत परदेशी न्यायाधिकरणांसमोर निकाली काढली गेली.

**परदेशी घोषित व्यक्ती:** गृह मंत्रालयाने संसदेत (हिवाळी अधिवेशन, २०१९) सांगितले की ऑक्टोबर २०१९ पर्यंत परदेशी न्यायाधिकरणांनी आसाममध्ये १,२९,००९ लोकांना परदेशी घोषित केले आहे आणि या संख्येत कोणत्याही लहान मुलाचा समावेश नाही. तसेच परदेशी न्यायाधिकरणांसमोर अपील केलेल्या १.१४ लाख लोकांना भारतीय नागरिक घोषित केले गेले होते. या परदेशी घोषित लोकांपैकी २९० महिला आहेत (ही आकडेवारी केवळ या वर्षासाठीच होती का याचे स्पष्टीकरण न देता) आणि परदेशी घोषित केलेल्या लोकांपैकी केवळ ६ जणांना हद्दपार केले गेले आहे (चार बांगलादेशात आणि दोन अफगाणिस्तानात). मंत्रालयाने पुढे असे म्हटले आहे की, ५ डिसेंबर २०१९ पर्यंत आसाममधून एकूण २२७ परदेशी व्यक्तींना त्यांच्या मूळ देशात परत पाठवण्यात आले आहे.

**अटक व्यक्तींची सुटका:** अटक व्यक्तींबाबत मंत्रालयाने म्हटले आहे की १८१ परदेशी घोषित लोकांनी ३ वर्षांहून अधिक काळ कैदेत काढला आहे. याव्यतिरिक्त, ३ वर्षांहून अधिक काळ अटक छावण्यांमध्ये काढलेल्या व्यक्तींची सुटका करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या मे २०१९ च्या आदेशानुसार १२८ कैद्यांना अटक छावण्यांमधून सोडण्यात आले आहे. केवळ २०१९ या एका वर्षात परदेशी न्यायाधिकरणांनी परदेशी म्हणून घोषित केलेल्या २८९ लोकांना अटक छावण्यांमध्ये कैद करण्यात आले आहे.

म्हणूनच एनआरसीमधून वगळले जाण्याची प्रक्रिया ही एकमेव अशी प्रक्रिया नाही जिच्यामध्ये भारतातील उपेक्षित घटकांना "त्यांचे अस्तित्व" सिद्ध करण्यास भाग पाडण्यात आले आहे. "संशयित/शंकास्पद" परदेशी नागरिक प्रक्रिया आणि "डी" मतदार प्रक्रिया अशाही इतर प्रक्रिया आहेत ज्यातून आसाममध्ये उपेक्षित घटकांना तपासणी व उलटतपासणीला सामोरे जावे लागले आहे.

## परदेशी लोक वादविवादामुळे लक्ष्यित हिंसाचार कसा घडतो: आसाम

वर दर्शवल्याप्रमाणे "बाहेरचे लोक" ही समस्या आणि नंतर परदेशी लोक या संज्ञेचे हळूहळू "बेकायदेशीर घुसखोर" या अपमानास्पद संज्ञेत झालेले रूपांतर आसाममध्ये नेहेमीच भावनिक राहीलेले आहे. बेकायदेशीर स्थलांतरीत लोकांबद्दलचा कोणतीही अचूक किंवा विश्वासार्ह सार्वजनिक आकडेवारी किंवा डेटा उपलब्ध नाही. पण त्यामुळे अनेक गट आणि राजकारणी काल्पनिक आकडे देण्यापासून थांबले नाहीत. यामुळे अगदी घटनात्मक अधिकाऱ्यांवरसुद्धा प्रभाव पडला आणि त्यांनी डेटा किंवा दस्तऐवजीकरण झालेली संख्या नसतानासुद्धा "भारतात

१० दशलक्ष बेवढाकादेशीर स्थलांतरीत लोवढ आहेत" (संसद, १९९७) असे विधान केले. ज्यापैकी सुमारे चार दशलक्ष बेकायदेशीर स्थलांतरीत लोक आसाममध्ये असल्याचे मानले जाते. या समस्येबद्दल कोणतीही विश्वासार्ह सांख्यिकी, आजपर्यंत उपलब्ध नाही.

आसाममधील १९७८ मधील आंदोलनापासून या प्रकारच्या चर्चेला चालना मिळाली आणि पुढे पुढे ते अधिक कडवट आणि हिंसक झाले. १८ फेब्रुवारी १९८३ रोजी नागाव जिल्ह्यातील भीषण नेल्ली हत्याकांड घडले, ज्यामध्ये बळी गेलेल्या व्यक्तींमध्ये बहुतेक स्त्रिया आणि मुलांचा समावेश होता, हा स्वतंत्र भारतातील पहिला मोठ्या प्रमाणावरचा नरसंहारक रक्तपात होता. ही गोष्ट राष्ट्रीय चर्चेतून हरवली गेली आणि विस्मृतीतून गेली. सहा तासांच्या कालावधीत, भारतीय मुस्लीम असलेल्या ३,००० व्यक्तींची, थंड डोक्याने हत्या करण्यात आली. यासंदर्भात कोणताही न्याय देण्यात आलेला नाही. नेल्लीशिवाय, फेब्रुवारी-मार्च १९८३ मध्ये गोआलपारा, कामरूप आणि दरंग या अविभाजित जिल्ह्यामध्ये मुस्लिमांना लक्ष्य करून हिंसा करण्यात आली.

या मोठ्या प्रमाणावरील नरसंहाराच्या व्यतिरिक्त इतर आंदोलने आणि विरोधाचे आवाज दाबण्यात आले, यावरून परदेशी नागरिक-विरोधी चळवळ किती हिंसक झाली होती हे लक्षात येईल. डाव्या आणि पुरोगामी चळवळींचे ६५ पेक्षा जास्त कार्यकर्ते आणि कामगार मारले गेले (यामध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (मार्क्सवादी) ५९ कार्यकर्त्यांचा समावेश होता. आसाम आंदोलनाच्या फॅसिस्ट चेहऱ्याविरूद्ध आंदोलन केल्याबद्दल त्यांना गप्प करण्यात आले. विशेषतः आंदोलकांनी धीरेश्वर नाथ यांना एका कबरीमध्ये जिवंतपणी पुरल्याची एक घटना निघृण होती. नाथ हे नागाव जिल्हा कृषक सभा या सीपीआय(एम)च्या शेतकरी आघाडीचे अध्यक्ष होते.

सांख्यिकीचे प्राध्यापक, अब्दुल मन्नास यांच्या "इन्फिल्ट्रेशनः जेनिसीस ऑफ आसाम मुव्हमेंट" २०१७ या पुस्तकामध्ये या समस्येच्या भोवती असलेल्या तीव्र भावनांचे तार्किक आणि सविस्तर स्पष्टीकरण दिलेले आहे. उन्माद आणि पूर्वग्रह यांच्या केंद्रस्थानी आसाममधील मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीचा जास्त दर हे सत्य आहे, असे ते म्हणतात. या मुस्लिमांची गरीबी आणि मागासलेपणा विचारात घेता वाढीचा हा दर भारतातील बंगाल आणि उत्तर प्रदेश या इतर मागास राज्यातील मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीप्रमाणेच आहे. त्याशिवाय तो, गरीबी आणि मागासलेपणाने ग्रासलेल्या अनुसूचित जाती (अ.जा.) आणि अनुसूचित जमाती (अ.ज.) या 'हिंदूं' मध्ये गणल्या जाणाऱ्या लोकसंख्येच्या वाढीइतकाच किंवा त्यापेक्षा कमी आहे.

मुस्लीम लोकसंख्या वाढीची संपूर्ण भारतातील आकडेवारीः संपूर्ण भारत ७१.४७, आसाम ७७.४२, उत्तर प्रदेश ७६.३०, पश्चिम बंगाल ७७.३२, मध्य प्रदेश ८८.३१, पंजाब ११०.३२, राजस्थान ८९.२९, त्रिपुरा ८९.०, हिमाचल प्रदेश (७७.६४) ड१९९१ मधील जनगणनेच्या

डेटाशी १९७१ च्या जनगणनेच्या डेटाची तुलना. याच कालावधीतला लोकसंख्या वाढीचा पृथक्करण डेटा पाहणे रंजक ठरेल;

अनुसूचित जाती (एससी): संपूर्ण भारत ७२.५८, आसाम ८१.८४, उत्तर प्रदेश ८३.६७, पश्चिम बंगाल ८२.४०, महाराष्ट्र १८९.४४, मणिपूर १२६.५८, कर्नाटक ९१.४१, मध्य प्रदेश ७६.५२. आसाम आणि भारतातील वाढीचा हा दर मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे.

त्याचप्रमाणे, अनुसूचित जमातींसाठी (एसटी): संपूर्ण भारत ७८.२४, आसाम ७८.९१, आंध्र प्रदेश १५३.३४, मध्य प्रदेश ८३.६०, महाराष्ट्र १४७.७२, त्रिपुरा ८९.३८. आसाम आणि भारतातील वाढीचा हा दर मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे.

यात हे स्पष्टपणे दिसते की प्रश्नांकित कालावधीत (१९७१-१९९१) वाढीचा दर मुस्लिमांमध्ये समग्र हिंदूंपेक्षा जास्त आहे. पण जेव्हा आपण अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (हिंदूंमधील) यांच्या वाढीचे दर अभ्यासतो, तेव्हा त्यांच्या वाढीचा दर हा मुस्लिमांपेक्षा जास्त दिसतो. हा कल संपूर्ण भारतात दिसतो आणि तो केवळ आसामपुरताच मर्यादित नाही.

# आसाममधील एनआरसी

## एनआरसी 1951:

राष्ट्रीय नागरिक नोंदणी १९५१ ही एक सामाजिक-आर्थिक स्थितीची नोंदणी आहे जी १९५१ जनगणनेनंतर प्रत्येक गावाच्या संदर्भात बनवण्यात आली होती. तिच्यामध्ये प्रत्येक गावातील घरांची अनुक्रमांकानुसार नोंद केली होती तसेच त्या घरांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींची संख्याही नोंदवली होती. आसाम हे देशातील एकमेव राज्य होते ज्याने १९५१ मध्ये त्या वर्षीच्या जनगणनेच्या आधारावर ८० लाख नागरिकांची नोंद असलेली एनआरसी बनवली होती.

सन १९५१ मध्ये केंद्र सरकारने दिलेल्या सूचनेनुसार ह्या नोंदवह्या उपायुक्त आणि उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयांमध्ये ठेवण्यात आल्या होत्या. नंतर १९६० च्या दशकाच्या पूर्वार्धात त्या पोलिसांकडे सोपवण्यात आल्या.

### एनआरसी 1951 - पूर्ण झाली नव्हती

एनआरसी १९५१ हा सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणाचा एक परिपूर्ण दस्तऐवज नव्हता आणि तो एक गोपनीय प्रशासकीय दस्तऐवज असल्यामुळे जनता त्याची पडताळणी करू शकत नव्हती.

असे असताना, एनआरसी १९५१ आसाममध्ये सध्या सुरू असलेल्या कार्यपद्धतींसाठी आधारभूत दस्तावेज कसे काय ठरू शकेल? हे अजूनही एक गूढ आहे.

**आसाम सरकारने राज्याच्या विधानसभेत कबूल केले होते की 1951 एनआरसी सहा जिल्ह्यांसाठी उपलब्ध नाही: कचर, कार्बी आंगलोंग, बक्सा, चिरांग, दिमा हसाओ आणि शिवसागर. 1951 च्या एनआरसी मध्ये एकट्या तिनसुकिया जिल्ह्यातली 626 गावे नाहीत, तर नलबारी, बारपेटा, लखीमपूर जिल्ह्यांमधल्या 200 हून अधिक गावांची माहिती/नावे उपलब्ध नाहीत. सरकारी आकडेवारीत असेही नमूद केले आहे की नलबारीमध्ये 481 गावांच्या एनआरसी 1951चे अर्धवट नुकसान झाले आहे तर लखीमपूर जिल्ह्यामधल्या 523 गावांच्या एनआरसी माहितीचे पूर्णपणे नुकसान झाले आहे.**

इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली या साप्ताहिकाच्या २१ फेब्रुवारी १९८१ च्या अंकात, राज्यामध्ये १९५१ची एनआरसी 'परकीय नागरिक' ओळखण्यासाठी आधार मानली जावी या ऑल आसाम स्टुडंट युनियनच्या (आसू) मागणीचा विरोध करताना अनिल रॉयचौधरी यांनी लिहिले होते की, "... १९५१च्या जनगणनेमध्ये ज्यांनी गणना करायचे काम केले होते तेच एनआरसीचे सुद्धा लेखक होते. जनगणनेच्या वेळी गोळा केलेली माहिती हा तिचा आधार होता. गणना करणाऱ्यांनी गणनेचे काम केवळ २० दिवसात पूर्ण केले होते. एखाद्या भागामध्ये गणनेतील कमतरतेमुळे किंवा इतर कारणामुळे, एखाद्या व्यक्तीचे नाव जनगणनेतून वगळले गेले असेल तर ते आपोआपच एनआरसीमधूनही वगळले गेले असणार आहे, आणि जर एखाद्या व्यक्तीची चुकून नोंद झाली नसेल तर, त्यानंतर त्याला एनआरसीमध्ये नाव नोंदवून घेण्याची संधी मिळणार नव्हती. ती व्यक्ती आक्षेपही नोंदवू शकणार नव्हती. कारण एनआरसी सार्वजनिकरित्या प्रदर्शितच करण्यात आली नसल्यामुळे एखाद्या व्यक्तीला आपले नाव वगळले आहे ही गोष्ट समजण्याला काही वाव नव्हता. संपूर्ण प्रकरण गणनाकारांच्या किंवा त्यांच्या पर्यवेक्षकांच्या लहरीपणावर अवलंबून असल्यामुळे पूर्णपणे एकतर्फी बनले होते. राष्ट्रीय नागरिक नोंदणी १९५१मध्ये त्यांचे नाव समाविष्ट केले गेले नाही तर भविष्यामध्ये त्याचे काय भयानक परिणाम होऊ शकतील याची कोणतीही सूचना लोकांना देण्यात आली नव्हती. त्यावेळी हे कोणालाच माहिती नव्हते की त्यांच्या एखाद्या चुकीमुळे किंवा अकार्यक्षमतेमुळे किंवा त्याहूनही वाईट म्हणजे एखाद्या 'अपात्र" किंवा 'अक्षम" अशा गणनाकारामुळे त्याला आणि त्याच्या वंशजांना भविष्यात केव्हातरी परदेशी म्हणून घोषित करण्यात येईल आणि हद्दपारीचा सामना करावा लागेल."

संपूर्ण भारतव्यापी एनआरसीचे भारतावर सावट असताना हा इतिहास लक्षात ठेवलाच पाहिजे.

## एनआरसी 2013 पूर्व

### एनआरसी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेची अंमलबजावणी करणारे एकमेव राज्य असलेल्या आसामचा याबाबतीतला काय अनुभव काय सांगतो?

राष्ट्रीय नागरिक नोंदणी ही एक अत्यंत क्लिष्ट अशी आणि आसामसाठी वैशिष्ट्यपूर्ण असलेली प्रक्रिया असून, जेव्हा परकीयांबद्दलच्या वास्तविक आणि कपोलकल्पित भयामुळे राजकारण आक्रमकता, संघर्ष आणि हिंसाचाराने ग्रासले होते अशा, आसाम करारापूर्वीच्या, अनेक वादळी वर्षांनंतर ही प्रक्रिया स्वीकारण्यात आली होती.

नागरिकत्व नोंदणी नियम, २००३ (एनआरसी नियम), आसामसाठी २००९ मध्ये सुधारित केले गेले आणि त्यात नियम ४अ समाविष्ट करण्यात आला, ज्यानुसार भारतातील इतर भागांप्रमाणे आसाममध्ये घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याची आवश्यकता नसून आसाममधील

सर्व रहिवाशांना नोंदणीसाठी अर्ज दाखल करण्यासाठी आमंत्रित केले गेले आहे. आसामसाठी भारतीय नागरिकांची राष्ट्रीय नोंदणी (एनआरसी) तयार करण्याच्या प्रक्रियेची रूपरेषा ठरवणारी अनुसूची नियमांमध्ये जोडली गेली आहे. मसुदा एनआरसी तयार करण्याची आणि त्यानंतर अंतिम एनआरसी तयार करण्याची विस्तृत प्रक्रिया यामध्ये दिलेली आहे. **कलम 8 मध्ये असे म्हटले आहे की जर आपले नाव अंतिम एनआरसीमधून गहाळ झाले असेल तर आपण परदेशी न्यायाधिकरणासमोर अपील करू शकता.**

## आसाममध्ये एनआरसीच्या कार्यपद्धती (2013 ते आजपर्यंत)

एनआरसी प्रक्रियेच्या अंमलबजावणीच्या कार्यपद्धती या मुद्द्याबाबत सर्व हितसंबंधींच्या संमतीने ठरवण्यात आल्या होत्या, ज्यामध्ये आसाम चळवळीचे समर्थक, विविध धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांक संघटना तसेच आसाममधील सर्व राजकीय पक्ष यांचा समावेश होता. पालन करावयाच्या पद्धती आणि सादर करण्याची कागदपत्रे हे या कार्यपद्धतींमध्ये ठरवण्यात आले आहे.

**वारसा आणि जोड:** सविस्तर चर्चा केल्यानंतर असे ठरवण्यात आले की एखाद्याच्या भारतीय नागरिकत्वाचा खरेपणा हा दोन प्रकारच्या कागदपत्रांवरून निश्चित करण्यात येईलः वारसा आणि जोड.

"वारसा कागदपत्रे" एखाद्या व्यक्तीचे किंवा त्याच्या पुर्वजांचे २५ मार्च १९७१ पूर्वीचे नागरिकत्व सिद्ध करतात. त्यांना यादी A ची कागदपत्रे असे म्हटले आहे. एनआरसी आसामच्या वेबसाइटनुसार, खालीलपैकी कोणतीही कागदपत्रे (२४ मार्च १९७१ च्या मध्यरात्रीपूर्वी जारी केलेली) स्वीकारली जातीलः

१) १९५१ एनआरसी

२) २४ मार्च १९७१ (मध्यरात्री) पर्यंतच्या मतदारयाद्या

३) जमीन आणि वहिवाट रेकॉर्ड

४) नागरिकत्व प्रमाणपत्र

५) कायमस्वरूपी रहिवासी प्रमाणपत्र

६) निर्वासित नोंदणी प्रमाणपत्र

७) पासपोर्ट

८) एलआयसी

९) शासनाने जारी केलेले कोणताही परवाना / प्रमाणपत्र

१०) शासकीय सेवा / रोजगार प्रमाणपत्र

११) बँक / पोस्ट ऑफिस खाते

१२) जन्म प्रमाणपत्र

१३) बोर्ड / विद्यापीठ शैक्षणिक प्रमाणपत्र

१४) न्यायालयाचे रेकॉर्ड / प्रक्रिया.

त्यानंतर आणखी दोन कागदपत्रे, ती म्हणजे (१) विवाहानंतर स्थलांतर केलेल्या विवाहित स्त्रियांसाठी मंडळ अधिकारी / जीपी सचिव प्रमाणपत्र (२४ मार्च १९७१ च्या मध्यरात्रीपूर्वी किंवा नंतरच्या कोणत्याही वर्षाचे असू शकते) आणि (२) २४ मार्च १९७१च्या मध्यरात्रीपर्यंत जारी केले रेशन कार्ड, समर्थनार्थ सादर करता येऊ शकतात. मात्र, वर दिलेल्या यादीतील कोणतेही एक कागदपत्र असेल तरच वरील दोन कागदपत्रे स्वीकारली जातील.

दुसरी आवश्यकता तेंव्हा निर्माण होते जेव्हा यादी A मधील कोणत्याही कागदपत्रावरील नाव अर्जदाराचे स्वतःचे नसेल तर त्याच्या/तिच्या पूर्वजांचे म्हणजे आईचे किंवा वडिलांचे किंवा आजीचे किंवा आजोबांचे किंवा खापरपणजोबा किंवा खापरपणजीचे (अशाप्रकारे) असेल. अशा वेळी अर्जदाराला यादी A मध्ये नाव असलेल्या त्या पूर्वजाशी म्हणजेच आई किंवा वडिल किंवा आजी किंवा आजोबा किंवा खापरपणजोबा किंवा खापरपणजी, यांच्याशी असलेले नाते सिद्ध करण्यासाठी खालील यादी B मधील कागदपत्रे सादर करावी लागतील. अशी कागदपत्रे कायदेशीररित्या स्वीकारार्ह कागदपत्रे असावीत जी त्यांचे नाते स्पष्टपणे सिद्ध करतील.

१) जन्म प्रमाणपत्र किंवा

२) जमिनीचे कागदपत्र किंवा

३) बोर्ड / विद्यापीठ प्रमाणपत्र किंवा

४) बँक / एलआयसी / पोस्ट ऑफिस रेकॉर्ड किंवा

५) विवाहित महिलांच्या बाबतीत मंडळ अधिकारी / जीपी सचिव प्रमाणपत्र किंवा

६) मतदार यादी किंवा

७) रेशन कार्ड किंवा

८) इतर कोणतेही कायदेशीररित्या स्वीकारार्ह कागदपत्र

यादी A मधील २४ मार्च १९७१ च्या मध्यरात्रीपर्यंतच्या कोणत्याही कालावधीचे कोणतेही एक कागदपत्र सादर करणे अद्ययावत एनआरसीमध्ये समाविष्ट करण्यासाठीची पात्रता सिद्ध करण्यासाठी पुरेसे असेल.

"जोड कागदपत्रे"१९७१ नंतर जन्मलेल्या व्यक्तीचे तिच्या १९७१ पूर्वीच्या भारतीय पूर्वजांशी किंवा तिच्या "वारसा व्यक्तींशी" असणारे खरेखुरे पैतृक नाते सिद्ध करतात. त्यांना यादी B ची कागदपत्रे असेही म्हटले जाते. एनआरसी आसामच्या वेबसाईटवर असे म्हटले आहे की यादी A च्या कोणत्याही कागदपत्रांमधील नाव अर्जदाराचे स्वतःचे नसून पूर्वजांचे असेल तरच ही आवश्यकता निर्माण होईल.

**कमजोर कागदपत्रे: एनआरसी प्रक्रिया अद्याप सुरू असताना, काही कागदपत्रे कोणतेही कारण न देता - आणि मनमानीने - नागरिकत्वाचा कायदेशीर पुरावा म्हणून स्वीकारली जाण्यासाठी कमजोर असल्याचे घोषित केले. असे एक कागदपत्र म्हणजे 1971 पूर्वीचे रेशन कार्ड, जे बहुतांश वेळा गरीब आणि कष्टकरी कुटुंबांकडे असलेला एकमेव कागदपत्रीय पुरावा असते. त्याचबरोबर मंडळ अधिकारी जीपी सचिव यांच्या स्वाक्षरीची कागदपत्रे आणि पंचायत लिंक प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे विवाहित स्त्रियांना प्रचंड त्रास झाला. इतर राज्यांनी जारी केलेली काही कागदपत्रेही अशाच प्रकारे विचारात घेतली गेली नाहीत.**

**अपरक्राम्य पर्यायी तरतुदी:** दोन तरतुदी – डीएमआयटी आणि डीएनए चाचणी – ज्या व्यक्ती त्यांच्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करू शकत नव्हत्या त्यांचे नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी या दोन तरतुदींची मदत झाली असती, पण अखेरीस त्या या प्रक्रियेतून वगळण्यात आल्या.

जर एखादा खरा भारतीय नागरिक योग्य ती कागदपत्रे सादर करू शकला नाही तर त्याच्या प्रकरणाची जिल्हा दंडाधिकारी तपासणी दल किंवा डीएमआयटीद्वारे स्वतंत्रपणे तपासणी केली जाऊ शकते, जी स्थानिक लोकांकडून माहिती गोळा करून अनाथ, निराधार किंवा कोणतीही

कागदपत्रे नसलेल्या एखाद्या व्यक्तीचे नाव समाविष्ट करण्याला मान्यता देऊ शकेल.

याचे कारण म्हणजे अंतिम विश्लेषणामध्ये, केवळ अनुवंशिक चाचणीच 'कोण भारतीय आहे' याविषयीच्या अफवा आणि द्वेष याला पूर्णविराम देऊ शकते.

डीएनए चाचणी करणे हा इतर सर्व गोष्टी अयशस्वी ठरल्यानंतर एखाद्या वारसा व्यक्तीशी नात्याचा दावा सिद्ध करण्यासाठीचा अंतिम लवाद होता, पण ती तरतूद सुद्धा आरजीआयच्या कार्यालयाने एकतर्फी निर्णय घेऊन काढून टाकली.

आसामच्या एनआरसीला अंतिम स्वरूप देण्याच्या प्रक्रियेदरम्यान, वारसा कागदपत्रे आणि या वारसा कागदपत्रांचे वापरकर्ते यांचे नाव, पद, वय यांमधील किरकोळ विसंगतींसाठीही मोठ्या संख्येने अर्ज नाकारण्यात आले. याउलट 'एनआरसीच्या पद्धतींमध्ये' असे स्पष्ट म्हटले आहे की, नाव, वय, पद यांच्यातील किरकोळ विसंगतींमुळे अद्ययावत एनआरसीमध्ये एखादे नाव

**नावे वगळणे: सर्वोच्च न्यायालयाच्या (13 ऑगस्ट 2019 रोजी दिलेल्या) आदेशामुळे ज्या व्यक्ती किंवा ज्यांच्या वारसा व्यक्ती डी-मतदार म्हणजे परदेशी नागरिक म्हणून घोषित केलेल्या होत्या किंवा परदेशी नागरिक न्यायाधिकरणात समोर खटला प्रलंबित असलेल्या व्यक्ती होत्या, त्यांनाही वगळले गेले.**

**आसामसाठी विशिष्ट असलेल्या आणि एकाच वेळी चालू असलेल्या परदेशी नागरिकांचा शोध घेण्याच्या इतर प्रक्रिया एनआरसी प्रक्रियेमध्ये मिसळल्या गेल्या, जरी सुरुवातीला तसे करणे ठरले नव्हते तरीही. ज्या कार्यपद्धती सुरुवातीला आसाममधील विविध हितसंबंधींच्या एकमताने प्रस्थापित केल्या असल्यामुळे "स्वतंत्र व निष्पक्ष" मानल्या जात होत्या त्यांच्याशीही छेडछाड केली गेली किंवा काही वेळा त्यांचे पंख छाटण्यात आले: हा स्पष्टपणे सर्वानुमताचा अनादर करण्याचाच प्रकार होता. द टेलीग्राफ मधील नोकरशाही आणि सरकारने कसा स्वत:च्याच लोकांचा विश्वासघात केला या लेखात, सीजेपीने दाखवून दिले आहे की, आसाममध्ये सध्या लोकसंख्येचा असा कोणताही वर्ग नाही ज्याच्यावर एनआरसी या बलाढ्य अशा राज्य-निर्मित आपत्तीचा परिणाम झालेला नाही."**

समाविष्ट करण्याच्या वैध मागणीवर परिणाम होणार नाही. प्रत्यक्षात मात्र २,५०० नागरिक सेवा केंद्रांमध्ये हे विशिष्ट आश्वासन पाळले जात नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात नावे वगळली जाऊन अन्याय होत आहे.

आसाममध्ये सध्या लोकसंख्येचा असा कोणताही वर्ग नाही ज्याच्यावर या बलाढ्य अशा राज्य-निर्मित आपत्तीचा परिणाम झालेला नाही. बंगाली भाषिक हिंदू, मुस्लिम, गुरखा, उत्तर आणि पश्चिम भारतातील हिंदी भाषिक असे सर्वजण यामध्ये सारखेच भरडले गेले आहेत. विविध प्रकारचे अर्ज भरण्यासाठी येणारा प्रचंड खर्च करून घरापासून खूप दूर अशा ठिकाणी आयोजित केलेल्या सुनावणीसाठी उपस्थित राहणाऱ्या स्त्रिया आणि पुरुषांवर या सगळ्याचा काय आघात होत असेल हे शब्दांत सांगणे कठीण आहे. याहून वाईट गोष्ट म्हणजे त्यांना एकदा नव्हे तर वारंवार सुनावणीसाठी 'वारसा व्यक्तींसह' बोलावले जाते.

## आसामच्या एनआरसीमध्ये कसे आणि कुठे चुकले:

### मतदार याद्या : नोंदींमधील नावांमध्ये तफावत

नावांमधील साध्या तफावतीमुळे (विशेषतः मतदार याद्यांमधील) निष्पाप नागरिक आसामच्या अटक छावण्यांमध्ये खितपत पडले आहेत. नावे नोंदवताना निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या चुकांमुळे अनेकांना अटक छावणीत जावे लागले. उदा. समन मलिकला अटक छावणीत जावे लागले, कारण निवडणूक अधिकाऱ्यांनी त्याचे नाव अतिशय अशक्य असे 'श्यामलाल अली' असे नोंदवले होते!

### जमिनींच्या नोंदी

आसाममधील ९० टक्के लोकांकडे जमिनीच्या नोंदी नाहीत म्हणजे कायमच्या भू व्यवस्था (म्यादीपट्टा) किंवा वार्षिक भू व्यवस्था (एकोनीपट्टा). हा फेब्रुवारी २०१७ मध्ये आसाममध्ये स्थानिक लोकांच्या जमिनीच्या हक्कांच्या रक्षणासाठी गठीत करण्यात आलेल्या ब्रह्मा समितीचा निष्कर्ष आहे.

**बोर्ड/विद्यापीठ/शैक्षणिक प्रमाणपत्र:** आता, हे लक्षात घ्या की सर्व वारसा कागदपत्रे मार्च २४, १९७१ च्या डेडलाईनच्या आधीची असली पाहिजेत. १९६१ च्या जणगणनेनुसार, आसाममध्ये दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेले १,४१,९४८ लोक होते, हा आसामच्या त्यावेळच्या लोकसंख्येचा एक अगदी छोटा भाग होता. राज्यातील असाक्षरतेचे उच्च प्रमाण पाहता आसाममधील किती लोकांकडे प्रत्यक्षात ही कागदपत्रे असतील?

**स्त्रियांना जास्त समस्या:** मुलींची लग्ने अल्पवयात होतात, एवढेच नाही तर बहुतेकांचा जन्म हॉस्पिटल किंवा आरोग्यकेंद्रांऐवजी घरीच झाल्यामुळे, त्यांच्याकडे क्वचितच जन्म दाखले असतात. अनेक मुलींना शाळेत पाठवले जात नाही त्यामुळे त्यांच्याकडे शैक्षणिक कागदपत्रे नसतात. खरे म्हणजेच, बऱ्याचदा त्यांच्याकडे कोणतीही कागदपत्रे नसतात, त्यामुळे पंचायत सचिवाचे किंवा गावबुराचे प्रमाणपत्र म्हणजे जीवनरेखा समजले जात असे. दीर्घकाळ चाललेल्या न्यायालयीन लढाईतून हे प्रमाणपत्र वैध समजले जाईल, असे ठरले तरीही ते एक कमकुवत कागदपत्र मानले गेले आणि त्याला इतर कागदपत्रांचा आधार देण्याची गरज असते, त्यामुळे विवाहित स्त्रिया पेचप्रसंगात अडकल्या!

**आसाम अटक छावण्या:** ७० वर्षीय महिला कदाचित सुटका होईलपर्यंत जगणार नाही.




*पार्बती दासचे चारगावमधील गावबुरा प्रमाणपत्र*

७० वर्षांची आई पार्बती दास कोक्राझारच्या अटक छावणीत २ वर्षे आणि ८ महिने खितपत पडलेली आहे. तिचा मुलगा बिस्वनाथ दास चिंताक्रांत आहे. त्याला काळजी वाटते की त्याची वयस्क आणि अशक्त आई आपल्या ढासळणाऱ्या प्रकृतीमुळे फार काळ जगणार नाही. "तिने असे तुरुंगात मरावे, असे मला वाटत नाही. तिने आरामात आणि आपल्या कुटुंबियांबरोबर आपल्या घरी असायला हवे, असे मला वाटते" कसाबसा आपला संयम रोखून धरत तो म्हणाला. पार्बती दास यांना आता अटक छावणीतून सोडण्यासाठी सीजेपी प्रयत्न करत आहे.

## एनआरसीमधील एनआरसी कार्यपद्धतीच कशा विकृत होत्या

मसुद्यानंतर पहिली एनआरसी यादी प्रसिद्ध करण्यात आली (जुलै ३१, २०१८). कार्यपद्धतीमधील महत्त्वाचे घटक अधिकाऱ्यांनी मनमानीपणा करून बदलले. यातील काही विपर्यास सर्वोच्च न्यायालयाने दुरूस्त केले तरी काही विसंगती शिल्लक राहिल्या. हे 'बदल' भारतीय सर्वोच्च न्यायालयासमोर केंद्रिय गृह खात्याद्वारे भारताचे महानिबंधक (आरजीआय), भारतीय सरकार

आणि आसाम राज्य सरकारचे अधिकारी, आणि आसाममधील एनआरसी अधिकारी यांच्या सल्ल्याने सादर केले गेले.

### एकट्या स्त्रिया असुरक्षित

उदाहरणार्थ, नवीन एसओपीमध्ये, ग्राम पंचायतीची प्रमाणपत्रे (३१ डिसेंबर २०१५ रोजी किंवा त्या पूर्वी जारी करण्यात आलेल्या इतर त्यानंतरच्या कागदपत्रांसह) आधारासाठी दस्तऐवज म्हणून स्वीकारण्याची सर्वोच्च न्यायालयाची परवानगी फक्त विवाहित महिलांसाठी लागू होईल या अटीमुळे, एकट्या स्त्रियांचा संपूर्ण गटच  वगळला जाण्याची भीती निर्माण झाली. या अटीमुळे गोंधळ तयार झाला कारण ज्या नागरिकांसाठी त्यांचे  पालकांशी असलेले नाते सिद्ध करण्यासाठी इतर कोणतीही कागदपत्रे नव्हती त्यांच्यासाठी ग्रामपंचायतीच्या प्रमाणपत्राला परवानगी असल्याची अट तयार करण्यात आली होती.

### अल्पवयीन मुले असुरक्षित

कुटुंबातील १४ वर्षांच्या खालच्या अल्पवयीन मुलांच्या संदर्भात, आधी असे आश्वासन देण्यात आले होते की जर कुटुंब वृक्षात कोणतीही त्रुटी नसल्याचे दिसून आले तर, अशा अल्पवयीन मुलांसाठी वारसा प्रमाणपत्रे स्वीकारली जाऊ शकतील. पण, एनआरसी यादीच्या पडताळणीच्यावेळी हे आश्वासन पाळण्यात आले नाही. आधी मान्य करण्यात आलेली गोष्ट करण्यास नकार देण्याचे हे स्पष्ट उदाहरण आहे.

### कागदपत्रांचा गोंधळ

विरोधाभास म्हणजे, जन्माचा पुरावा म्हणून जन्म दाखले असे वरवरचे कारण देऊन नाकारण्यात आले की ते विहित कालावधीत जारी करण्यात आलेले नव्हते.

वारसा डेटाबेस - जो आधी सार्वजनिक होता - आता गोपनीय करण्यात आला आणि दोन वर्षांपूर्वी लपवण्यात आला. त्याचवेळी, सर्व सक्षम अधिकाऱ्यांना ही कागदपत्रे जारी करण्याची बंदी घालण्यात आली.

### आक्षेपांच्या कार्यपद्धतींचा गैरवापर होऊ शकतो

केंद्रिय गृह मंत्रालयाने दावे आणि आक्षेपांच्या प्रक्रियेसाठी (१५ डिसेंबर २०१८ पासून २,५०० अधिकाऱ्यांसाठी) दोन-महिन्यांच्या कालावधीला परवानगी देऊन परिस्थिती अजून बिघडवली. कोण आक्षेप नोंदवू शकेल आणि किती आक्षेप सादर करू शकेल, याचे काहीही निकष नव्हते.

पहिली गोष्ट म्हणजे, कोणाचेही नाव एनआरसी मध्ये समाविष्ट केल्याबद्दल कोणीही आक्षेप घेऊ शकते. म्हणजे एनआरसी मध्ये नाव समविष्ट झालेल्या नशीबवान लोकांमध्ये तुम्ही असलात तरी, ते अंतिम नाही, कारण तुमचा एनआरसी मध्ये समावेश झाल्याबद्दल कोणीतरी आक्षेप नोंदवू शकतो! नियोजनबद्ध पद्धतीने आणलेल्या अडथळयाचे एक लाजिरवाणे उदाहरण म्हणजे आसाममध्ये केवळ काही दिवसातच १.५ लाख एकसारखेच (झेरॉक्स) आक्षेप नोंदवण्यात आले!

## आसामला दुहेरी संकटाचा धोका

आसामने याआधीच आसाम करार प्रणित एनआरसीच्या संकटाचा २००५ पासून सामना केला आहे. आता भारत सरकार आसाममध्ये पुन्हा एका एनआरसीची धमकी देत आहे! राज्यात आजपर्यंत १०० जणांचे यामुळे मृत्यू झाले आहेत, ३.२ कोटी पेक्षा जास्त लोकांना या प्रक्रियेतून जावे लागले आहे. लोकशाही मार्गाने निवडून आलेले एखादे सरकार अशाप्रकारे आसामच्या जनतेला पुन्हा पुन्हा त्याच प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी, कायद्याच्या दृष्टीने, दुहेरी संकटात ढकलू शकते का?

## मुस्लिम आणि बंगाली हिंदूंच्या जमिनी बळकावणे

जणूकाही या अघोरी प्रक्रियेची पूर्वतयारी म्हणजेच की काय, आसाम सरकारने २८ नोव्हेंबर २०१९ रोजी नवे जमीन धोरण २०१९ मांडले. त्यानुसार, ब्रह्मपुत्र खोऱ्यातील चर व नदीच्या क्षेत्रातील आणि आदिवासी पट्टा आणि वन कुरणांच्या क्षेत्रातील अनुक्रमे ७० लाख मुस्लीम आणि ६० लाख बंगाली हिंदू भूमिहीन होण्याची शक्यता आहे. 'जमिनीच्या वापरकर्त्या''मध्ये सरकारी जमीन असा बदल करून, स्वतःच्याच लोकसंख्येतील १३ दशलक्ष (एकूण १३० लाख) लोकांना बेघर आणि भूमिहीन करून सोडण्याचा भाजप-शासित राज्य सरकारचा अघोरी डाव आहे.


साकेन अली

नावाच्या स्पेलिंगमधील एका अगदी क्षुल्लक तफावतीमुळे, ज्यात त्याच्या नावात एक अतिरिक्त 'h' लिहिला गेला होता, साकेन अलीला अटक छावणीत ५ वर्षे यातना भोगाव्या लागल्या.

याचा अर्थ काही प्रकरणांमध्ये तर अनेक व्यक्तींना त्यांच्या कुटुंब-वृक्षातील संपूर्ण लवाजम्यासह तब्बल ७ ते १४ वेळा सुनावणीसाठी हजर राहावे लागले आहे. म्हणजे एखाद्या विस्तारित कुटुंबातील ४०-८० सदस्यांना त्यांच्या घरापासून शेकडो किलोमीटरवर असलेल्या ठिकाणी प्रवास करून जावे लागते. फार दिवसांपूर्वीची गोष्ट नाही; दिल्लीमधील एका प्रतिष्ठित विद्यापीठातील एका प्राध्यापकाला त्याच्या कुटुंबातील सर्व सदस्यांसह दिल्लीपासून अप्पर आसाममधील लखिमपुरपर्यंतचा, म्हणजे सुमारे ३००० किलोमीटरचा, प्रवास तीन वेळा करावा लागला होता.

## आसामपासून धडा, भारत सावधान

मानवाधिकार, कायदा आणि राज्यघटना याची पायमल्ली करणाऱ्या एक स्पष्ट प्रक्रियेकडे आसामच्या अनुभव लक्ष वेधतो. जसजसे राजकीय वारे बदलत गेले तशी न्यायालयीन हमी आणि इतर आश्वासनेही डावलली गेली कारण असंवैधानिक दृष्टिकोन असलेल्या कार्यकारी शाखा आणि विधिमंडळ या दोघांनीही नोकरशाही प्रक्रियेवर प्रभाव पाडण्यासाठी बहुसंख्यांकतेचा रानटीपणे वापर केला. आपण सध्या ज्या राजकीय परिस्थितीतून जात आहोत ते पाहता उर्वरित भारताने यातून धडे घेतले पाहिजेत. सीएबी २०१९ च्या माध्यमातून नैसर्गिकीकरणाच्या आधारे नागरिकत्वासाठी भेदभावात्मक आधाराचा समावेश केला जात असल्यामुळे आता भारताच्या सर्वात मोठ्या अल्पसंख्याक समाजाविरूद्धची कारस्थाने वाढण्याची शक्यता जास्त आहे.

या पद्धतींमध्ये पूर्वी मान्य करण्यात आलेली कागदपत्रे आणि निकष नंतर "नाकारले" गेले किंवा ती प्राप्त करण्यात अडथळे आणण्यात आले. जन्म प्रमाणपत्रे ते नमूद केलेल्या कालावधीचे नसल्याचे सांगून नाकारले गेले! लेगसी डेटा सील केला गेला होता! अखिल भारतीय एनपीआर-एनआरसी प्रक्रिया सुरू झाल्यावरसुद्धा हे असेच घडू शकते.

**केंद्र सरकारने संसदेच्या 2019 च्या हिवाळी अधिवेशनात हे स्वीकारले आहे की, एनपीआर / एनआरसी प्रक्रिया देशभर राबवण्यासाठीचा खर्च रुपये 4000 कोटींपेक्षा कमी असणार नाही. मात्र, जर एका राज्यातील खर्च 1220 कोटी रुपये असल्याचे मान्य केले गेले असेल तर निश्चितपणे अखिल भारतीय एनआरसीची किंमत कितीतरी जास्त असेल?**

## परदेशी नागरिक न्यायाधिकरणे: आसाम आणि संपूर्ण भारत

परदेशी नागरिक न्यायाधिकरणांची (एफटी) स्थापना परदेशी नागरिक कायदा, १९४६ मध्ये

दिलेले अधिकार वापरून केंद्र सरकारने संमत केलेल्या परदेशी नागरिक (न्यायाधिकरणे) आदेश, १९६४ नुसार केली गेली आहे. या आदेशानुसार केंद्र सरकार किंवा कोणतेही निर्दिष्ट प्राधिकरण, एखादी व्यक्ती परदेशी नागरिक कायदा १९४६ मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार परदेशी नागरिक आहे का हे ठरवण्यासाठीचे प्रकरण याच हेतूने स्थापन करण्यात आलेल्या न्यायाधिकरणाकडे सोपवेल. परदेशी नागरिक शोधण्यासाठी प्रक्रिया देखील तेच ठरवेल. याबाबतची प्रक्रिया कोणत्याही कायद्याद्वारे घालून देण्यात आलेली नाही, संसदेत तिच्यावर चर्चा केलेली नाही आणि संमत केलेली नाही तर केवळ कार्यकारी (सरकार) आदेशाद्वारे पास केली आहे. जरी या न्यायाधिकरणांची स्थापना राज्यघटनेच्या कलम ३२३ (अ) आणि (बी) नुसार प्रस्थापित वैधानिक आधाराशिवाय केली आहे ही वस्तुस्थिती असली, तरीही एका स्वातंत्र्यपूर्व कायद्यानुसार देण्यात आलेल्या केवळ कार्यकारी आदेशावरून स्थापन झालेल्या या परदेशी न्यायाधिकरणांना सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी कायदेशीर मान्यता दिली आहे.

**परदेशी न्यायाधिकरणांचे कार्य (एफटी):** उचित कार्यपद्धतीचा अभाव आणि मुळातच अपारदर्शक कारभार यामुळे एफटीच्या कार्यावर प्रचंड टीका झाली आहे. घाईगडबडीत खटल्यांचे निकाल, न्यायाधिकरणांच्या अध्यक्षस्थानी कायदेतज्ज्ञ व्यक्ती नसणे यामुळे त्यांच्या कार्याबद्दल प्रश्न उपस्थित होणे साहजिक आहे. आसामच्या परदेशी न्यायाधिकरणे एकतर्फी निर्णय देत असल्याचे मोठ्या प्रमाणावर आढळून आहे. म्हणजे, ज्या व्यक्तीवर भारतीय नसल्याचा आरोप केला गेला आहे तिला किंवा त्याला स्वतःचा बचाव करण्याची उचित संधीदेखील दिली जात नाही. त्यांच्यावर पक्षपातीपणाचे गंभीर आरोपही झाले आहेत.

त्यांच्या संबंधित स्थानिक कार्यक्षेत्रांमधून कार्यवाही सुरू करणे, समन्स बजाविणे, गुन्हे नोंदविणे आणि त्यांना परदेशी नागरिक (न्यायाधिकरण) आदेश, १९६४ (आदेश) परिच्छेद ३ च्या अंतर्गत कार्यवाही सुरू करण्यासाठी तथाकथित परदेशी न्यायाधिकरणांकडे पाठविण्यासाठीचे सक्षम प्राधिकरण म्हणून आसाम सीमा पोलिसांना अधिकार देण्यात आले आहेत. आधी कोणताही तपास न करता केलेली ही कृत्ये बऱ्याच वेळा अवास्तव आणि मनमानी असल्याचे आढळले आहे. २०१३ मध्ये एनआरसी प्रक्रियेला गती मिळण्यापूर्वीपासूनच आसाम बॉर्डर पोलिस अशा नोटीसा बजावत आले आहेत आणि परदेशी नागरिक न्यायाधिकरणांसमोर हजर राहण्याच्या खडतर प्रक्रियेला तोंड देण्यासाठी लोकांना भाग पाडत आहेत.

या न्यायाधिकरणांना, उपरोल्लेखित आदेशाच्या परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या पद्धतींचे पालन करणे बंधनकारक आहे. ज्यामध्ये व्यक्तींना त्यांना परदेशी का मानण्यात आले आहे याची मुख्य कारणे असलेली नोटीस देण्याचा समावेश आहे जेणेकरून त्यांना ते भारतीय नागरिक असल्याचे सिद्ध करण्यासाठी उचित आणि वाजवी संधी मिळेल. ही पद्धत बंधनकारक आहे. मात्र अनेकांच्या

निवेदनातून आणि मौखिक साक्षीतून हे आढळून आले आहे की सुरु करण्यात आलेल्या कार्यवाही मध्ये परिच्छेद ३ मधील तरतुदींचे पालन केले नव्हते. पॅनेलसमोर ही सर्वसामान्य वस्तुस्थिती मांडण्यात आली आहे की स्थानिक पोलिस अधिकार किंवा कार्यक्षमता नसताना आणि संबंधित नोंदींची पडताळणी न करताच मनमानीपणे प्रकरणे नोंदवतात.

**न्यायाधिकरणांच्या सदस्यांची पात्रता:** आवश्यक न्यायालयीन अनुभव नसलेल्या अनके वकिलांची राज्य सरकारने परदेशी नागरिक न्यायाधिकरणांवर न्यायाधीश म्हणून नेमणूक केली आहे. याहून वाईट म्हणजे, त्यांनी घालून दिलेली टार्गेट्स पूर्ण करणे अपेक्षित आहे.

**कोणतीही प्रस्थापित प्रक्रिया नाही:** ही एफटी पुरावे गोळा करण्या संदर्भात कोणत्याही प्रस्थापित प्रक्रियेचे पालन करत नाहीत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि न्यायाची चेष्टा घडत आहे.

**भारतीय नागरिकत्वाचा पुरावा:** परदेशी न्यायाधिकरणांसमोर हजर होणाऱ्या व्यक्तींना त्यांचे नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी कागदोपत्री आणि तोंडी पुरावे सादर करण्याचा अधिकार आहे. या पुराव्यांवर वस्तुनिष्ठपणे विचार करणे आवश्यक आहे; म्हणजे असे की संबंधित व्यक्ती दोनहून अधिक पिढ्यांपासून आसामच्या विविध भागांत स्थायिक आहेत हे ध्यानात ठेऊन. त्यापैकी काही जणांनी आसाममध्ये नोकरी केली आहे आणि आताशी निवृत्तही झाले आहेत; काहीजणांच्या शेतजमिनी आहेत आणि कित्येक वर्षांपासून आपापल्या गावांमध्ये गावात राहात आहेत. त्यापैकी काही लोक अगदी फार पूर्वी म्हणजे १३/१४व्या शतकात स्थलांतरित झाले आहेत, तर काही लोक १९ व्या शतकात किंवा १९७१ च्या आधी तरी आसाममध्ये स्थायिक झाले आहेत.

हे सर्व लोक, जे खूप वर्षांपासून आसाम राज्याच्या विविध भागांमध्ये शांतपणे वास्तव्य करीत आहेत, ते जन्मामुळे भारतीय राज्यघटनेच्या कलम ५ नुसार (राज्यघटनेला प्रारंभ होतेवेळी नागरिकत्व) आणि कलम १० नुसार (नागरिकत्वाचे हक्क कायम राहणे) किंवा राज्यघटनेच्या कलम ११ नुसार, कायद्याने नागरिकत्वाच्या अधिकाराचे नियमन करण्यासाठी संसदेने संमत केलेल्या नागरिकत्व कायदा, १९५५ नुसार नैसर्गिकीकरणाद्वारे भारतीय नागरिकत्व मिळण्याच्या नियमानुसार, भारतीय नागरिकत्वासाठी पात्र ठरतात. या व्यक्तींना कायद्यानुसार केंद्र सरकारकडे नागरिकत्व कायद्याच्या कलम ६ अन्वये नैसर्गिकीकरणाद्वारे नागरिकत्व मिळविण्यासाठी विनंती सादर करण्याचा अधिकार आहे. त्यानंतर ते त्या विनंतीची एक प्रत परदेशी न्यायाधिकरणांकडे सादर करू शकतील आणि त्यांच्या विनंतीवर केंद्र सरकारच्या निर्णयाची प्रतीक्षा करण्यासाठी कारवाईला स्थगिती देण्यास सांगू शकतील.

**एनआरसीच्या अंतिम यादी नंतर:** आसामसाठी, कलम १बी आणि ३ए चा समावेश करून १९६४

च्या आदेशात सुधारणा करण्यात आली. परदेशी न्यायाधिकरणाच्या इतर तरतुदी आसामबाबत लागू होत असल्या तरी, एनआरसीसंबंधी काही विशिष्ट तरतुदींमुळे आता एनआरसीला अंतिम स्वरूप देताना परदेशी न्यायाधिकरणांकडे अपील करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे जेव्हा ३१.८.२०१९ रोजी आसामच्या एनआरसीची अंतिम यादी प्रकाशित झाली तेव्हा त्यांना या यादीत स्थान मिळाले नाही ते परदेशी न्यायाधिकरणांकडे अपील दाखल करू शकतात आणि या परदेशी न्यायाधिकरणांनी त्यांना परदेशी मानले तरच त्यांना अखेरीस परदेशी नागरिक म्हणून घोषित केले जाईल.

**अखिल भारतीय परदेशी नागरिक न्यायाधिकरणे:** आता अखिल भारतीय स्तरावरील एनआरसीची चर्चा जोर पकडत असताना, केंद्रीय गृहमंत्रालयाने, परदेशी नागरिक कायदा १९४६ च्या कलम ३ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, ३०.०८.२०१९ च्या आदेशाद्वारे, परदेशी नागरिक (न्यायाधिकरणे) आदेश १९६४ (परदेशी नागरिक (न्यायाधिकरणे) (दुसरी दुरुस्ती) आदेश २०१९) ही दुरुस्ती केली आहे. या दुरुस्तीद्वारे, परिच्छेद ३ए मध्ये, "नागरिकत्व (नागरिकांची नोंदणी आणि राष्ट्रीय ओळखपत्रे जारी करणे) नियम, २००३" ला जोडलेल्या अनुसूचीच्या परिच्छेद ८ अंतर्गत अपील समाविष्ट केले गेले आहे; त्याद्वारे आता अखिल भारतीय स्तरावर एफटी लागू होऊ शकणार आहे. तथापि हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, आसाम सोडून अशी न्यायाधिकरणे इतरत्र कोठेही स्थापन केलेली नाहीत. म्हणूनच, सर्वसाधारणपणे पासपोर्ट किंवा वैध प्रवासी कागदपत्रे नसलेल्या परदेशी लोकांना पासपोर्ट (भारतात प्रवेश) कायदा, १९२० अन्वये भारतात अटक केली जाते आणि त्यांच्यावर खटला भरला जातो.

## अटक छावण्या

आसाममधल्या अटक छावण्यांचे अनुभव फारच भयानक होते. आणि, आता कर्नाटक आणि महाराष्ट्रानेही अटक छावण्या स्थापन करण्याची घोषणा केली आहे. जुलै २०१९ मध्ये संसदेतील एका प्रश्नाला उत्तर देताना केंद्र सरकारने सांगितले की त्यांनी "आदर्श अटक केंद्र / ताबा केंद्र / माहितीपत्रक" सर्व राज्यांना पाठवले आहे. मात्र त्याच्या प्रती अद्याप सार्वजनिकरित्या उपलब्ध नाहीत. त्या छावण्या राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यांनी ठरवलेल्या मानकांची पूर्तता करतात की नाही याची शहानिशा करण्याचा कोणताही मार्ग सध्या आपल्याकडे नाही. परदेशी नागरिकांचा प्राथमिकतेने शोध घ्यायला सुरुवात करण्याचे "निर्देश" देखील केंद्र सरकारने स्थानिक राज्य सरकारांना जारी केले आहेत.

आसामच्या अटक छावण्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर भयानक अनुभव आले आहेत आणि तिथे

आत्तापर्यंत २८ जणांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. सध्या आसाममध्ये सहा अटक छावण्या असून स्थानिक तुरुंगांमध्ये बनवण्यात आलेल्या तात्पुरत्या सुविधांमध्ये त्या कार्यरत आहेत. सध्या त्यांचे कार्य आसामच्या जेल मॅन्युअलमधील तरतुदींनुसार सुरू आहे. पण आता गोआलपारा येथे एक स्वतंत्र अटक छावणी उभारण्यात येत आहे आणि सिलचर, तेजपूर अशा ठिकाणी आणखी छावण्यांचे नियोजन करण्यात आले आहे. आसामच्या अटक छावण्यांमधली परिस्थिती केवळ वाईटच नसून त्या कोणत्याही वैधानिक जबाबदाऱ्यांचे किंवा पारदर्शकतेचे पालन न करता कार्य करत आहेत. आपल्या तुरुंगांमधील इतर भारतीय कैद्यांना सुविधा मिळतात तितक्या मूलभूत सुविधा देखील कैद्यांना पुरवण्यात आलेल्या नाहीत. महिलांनाही गर्दीत कोंबण्यात आले असून अन्नपाणी आम्ही इतर गोष्टींचाही पुरेसा पुरवठा करण्यात येत नाही. केवळ अटक छावण्यांमध्ये आयुष्य व्यतीत करण्याच्या भीतीमुळे आसाममध्ये कित्येकांचे धक्क्याने मृत्यू झालेले आहेत किंवा त्यांनी आत्महत्या केल्या आहेतः कारण एकदा तुम्ही आत गेलात की परत कधी बाहेर सोडण्यात येईल याची कोणतीही शाश्वती नाही!

## भौतिक किंमत (मटेरियल कॉस्ट)

### एनआरसी प्रक्रियेने आसाममधील करोडो भारतीय नागरिकांना कंगाल केले आहे.

आसामच्या एनआरसी प्रक्रियेची मानवी आणि भौतिक किंमत प्रचंड आहे. फक्त राज्याने एनआरसी प्रक्रियेवर १२२० कोटी रुपये खर्च केले आहेत. एका मानवाधिकार संघटनेने राज्यातील फक्त चार जिल्ह्यांमध्ये केलेल्या सर्वेक्षणामध्ये, प्रती कुटुंब प्रत्येक टप्प्याच्या सुनावणीसाठीचा खर्च तब्बल ७,८३६ कोटी रुपये असल्याचे आढळले आहे. (२०१८ मध्ये एनआरसीच्या मसुद्यातून वगळलेल्या ४१,१०,१६९ व्यक्तींसाठी याची गणना केली गेली) त्याआधी डिसेंबर २०१७ मध्ये १.२ कोटी लोकांना वगळले होते, तर एक वर्षाने २०१८ मध्ये हा आकडा कमी झाला असला तरी लक्षणीय म्हणजे १९ लाख आहे. राज्यातील १३ टक्के उपेक्षित आणि गरीब जनतेने केवळ ते भारतीय असल्याचे सिद्ध करण्यासाठी वरील गुंतवणूक केली आहे! अनेकांना शेतजमीन गहाण ठेवावी लागली, त्यांची गुरे / पशुधन व शेतीविषयक वस्तू किंवा ऑटो-रिक्षासारख्या त्यांच्या उत्पन्नाचे एकमेव साधन असलेल्या गोष्टी विकाव्या लागल्या, तर अनेकांनी एनआरसी सुनावणीच्या खर्चासाठी कर्ज घेतले, असे अहवालात म्हटले आहे. इतके जास्त पैसे खर्च करावे लागले कारण जेव्हा कुटुंबातील एखादी व्यक्ती एनआरसीच्या मसुद्यातून वगळली जाते, तेव्हा केवळ त्या वगळलेल्या व्यक्तीस एनआरसी सुनावणीस हजेरी लावून भागत नाही तर कुटुंबातील सर्व प्रौढ सदस्य किंवा रक्ताचे नातेवाईक ज्यांचा अन्यथा मसुद्यामध्ये समावेश आहे त्यांनाही एनआरसी अधिकार्यांसमोर साक्षीदार म्हणून हजर राहावे लागते. आणि ही केंद्रे सहसा शेकडो किलोमीटर अंतरावर असतात!

लक्षावधी आसामी लोकांच्या आयुष्यात अत्यंत गरीबीची, उपासमारीची आणि अटक छावण्यांमध्ये तुरूंगवास भोगण्याची शक्यता निर्माण झाली आहे कारण एनआरसीच्या प्रकाशनानंतर प्रत्येक व्यक्तीला परदेशी नागरिक न्यायाधिकरणांसमोर अपील दाखल करावे लागेल किंवा परदेशी मानले जाऊन त्याच्या कठोर दुष्परिणामांना सामोरे जावे लागेल, जी एक वेळखाऊ आणि महाग प्रक्रिया आहे. वगळलेल्या प्रत्येक व्यक्तीचा किमान खर्च ६०,००० रुपये (कायदेशीर फी आणि प्रवासासहित लॉजिस्टिकल खर्च) असेल असा अंदाज आहे म्हणजे १९,०६,६५७ वगळलेल्या व्यक्तींसाठी एकूण खर्च ११४३९.९४ कोटी रुपये असेल.

जागतिक बँकेने तिच्या २० जून २०१७च्या "आसामः गरीबी, विकास आणि असमानता" या अहवालात म्हटले आहे की केवळ आर्थिक वाढीच्या बाबतीतच आसाम बहुतेक भारतीय राज्यांपेक्षा मागे पडलेला नाही तर "२००५ नंतर आसाममधील दारिद्रय निर्मूलन कमी सर्वात कमी वेगाने होत असून आसाममधील दारिद्रयाचे प्रमाण हे राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त राहिले आहे आणि राज्याच्या काही भागांमध्ये दारिद्रयाची पातळी खूपच जास्त आहे."

राज्याच्या आणि वैयक्तिक नागरीकांच्या संसाधनांचा त्यांचे नागरिकत्व सिद्ध करण्याच्या भयंकर आणि महागड्या प्रक्रियेवर झालेला खर्च पाहता यात काही आश्चर्य आहे का?

## 31 ऑगस्ट 2019 नंतर

एनआरसीनंतर, १९ लाख (१.९ दशलक्ष) लोक डोक्यावर राज्यहीनतेची टांगती तलवार घेऊन जगत आहेत. आता जवळपास चार महिने होत आले तरीही त्यांना यादीतून वगळण्यात आल्याचे कारण सांगण्यात आलेले नाही! आणि आता केंद्र सरकारने आसाममध्ये आणखी एक एनआरसी केली जाण्याची भीती घातली आहे! मग त्या १९ लाख लोकांचे काय होईल ज्यांना एका निर्दयी राज्याने २०१३ पासून या प्रक्रियेतून जाण्यास भाग पाडले आहे? या १९ लाख लोकांपैकी ४,३०,००० लोक उत्तर, दक्षिण आणि पश्चिम भारतातील हिंदी भाषिक (हिंदू) आहेत ज्यांनी अर्ज केले नव्हते. याशिवाय ८५,००० गुरखा आणि इतर जमातींचे लोक, ४.८६ लाख मुस्लिम आणि तब्बल ६.९० लाख बंगाली हिंदू लोक या यादीत आहेत! "बंगाली हिंदू" त्यांच्या भाषेच्या आधारावर सुधारित सीएबीकडून "संरक्षण" मागू शकतील असे मानले तरीही पिढ्यानपिढ्या आसाममध्ये राहात असलेल्या हिंदी भाषिक लोकांचे काय होईल? अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगलादेशातील "छळ झालेले अल्पसंख्यांक" लोक हे हिंदी भाषिक तर असू शकणार नाहीत, होय ना?

यावर तोडगा म्हणून आसाममधील बंगाली हिंदूंना (एका सांप्रदायिक आणि जातीयवादी राजकीय चर्चेत) सीएबी २०१९ ची मध्ये "ऑफर" देण्यात आलेली आहे. राज्यातील २०१६ च्या

निवडणुकीत याचा काही प्रमाणात फायदाही झाला. पण जर सध्याचा कल विचारात घेतला तर, सीएबी अंतर्गत त्यांच्या "छळ झालेले अल्पसंख्याक असल्याच्या अस्तित्वाची पुष्टी" करण्यातील गुंतागुंती आणि विरोधाभासांना तोंड द्यावे लागणार असल्यामुळे आणि त्याद्वारे मागील सर्व इतिहास आणि कागदपत्रे नाकारावी लागणार असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपेक्षाभंग झाला आहे. त्याशिवाय, उर्वरित आसाम सीएबी २०१९ विरुद्धच्या आंदोलनात "पेटलेला" आहे आणि बंगालीविरोधी भावनांना सक्रियपणे उत्तेजन दिले जात आहे.

२६ मे २०१८ रोजी, सुब्रत डे हा बंगाली हिंदू गोआलपाडा अटक छावणीत रहस्यमय परिस्थितीत मरण पावला. त्याच्या अकाली मृत्यूच्या काही दिवस आधी त्याची आई जेव्हा त्याला भेटायला गेली तेव्हा त्याची तब्येत अगदी व्यवस्थित होती. आसामच्या अटक छावण्यांमधील कैद्यांच्या एकूणच आरोग्याची आणि आहाराची अधिकार्यांकडून अजिबात पाहणी किंवा चौकशी केली जात नाही. चहाचे दुकान चालवून चार पैसे मिळवणारा सुब्रत हा त्याच्या घरातील एकुलता एक कमावता सदस्य होता. आता त्याच्या जाण्याने ही कमाई देखील बंद झाल्याने त्याच्या कुटुंबावर हातावर पोट भरण्याची वेळ आली आहे.

लोअर आसाममधील गोआलपारा जिल्ह्यातील कृष्णाई पोलिस स्टेशनच्या हद्दीतील आशुदुबी या गावातील सुब्रत डे याचे प्रकरण पहा. डे याचा मे २०१८ मध्ये गोआलपारा अटक छावणीत मृत्यू झाला. त्याची आई अनिमा यांच्या म्हणण्यानुसार, "एफटीमध्येमाझ्या मुलाचा खटला लढण्यासाठी आम्हाला वकीलांची फी आणि अतिरिक्त खर्च म्हणून सुमारे एक लाख रुपये खर्च करावे लागले. सुब्रतला परदेशी नागरिक घोषित करून त्याला अटक छावणीत पाठविल्यानंतर आम्ही आमची पाळीव जनावरे व इतर काही मालमत्ता विकून दोन लाख रुपये जमा केले जे आम्ही एका वकिलाला हायकोर्टात हा खटला लढण्यासाठी दिले. पण दोन वर्षांनंतरही सुब्रतच्या मृत्यूपर्यंत हा खटला सुरू झाला नाही." त्यांना सर्वात क्रूर धक्का ३१ ऑगस्ट २०१९ रोजी बसला जेव्हा त्याच्या कुटुंबातील सगळ्यांनाचा



*सुब्रत डेचा फोटो*

अंतिम एनआरसीमधून वगळले गेले!

त्याचप्रमाणे उदलगुडी जिल्ह्यातील रावता बागान भागातल्या जब्बार अली (सीजेपीचा लेख वाचाः आसामच्या अटक छावणीत शिबिरामध्ये आणखी एक रहस्यमय मृत्यू) याने एएफटीमध्ये आपला खटला लढण्यासाठी वकिलाला ५०,०००/- रुपये दिले होते. जेव्हा त्याला परदेशी नागरिक घोषित करण्यात आले आणि तेजपूर अटक छावणीत टाकण्यात आले तेव्हा त्याच्या कुटुंबियांनी १,००,०००/- रुपयांचे कर्ज घेतले आणि जब्बारच्या सुटकेच्या आशेने ते गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या एका प्रख्यात वकिलाला दिले. मात्र जब्बारने दोन वर्षे अटक छावणीतच घालवली आणि तिथेच त्याचा मृत्यू झाला आणि असे दिसते की अल्पसंख्यांकांच्या हक्कांचा स्वयंघोषित मानवतावादी वकील ज्याने हा खटला स्वीकारला होता त्याने गुवाहाटी उच्च न्यायालयात हा खटला पुढे जाण्यासाठी काहीच केले नाही.

अशाच प्रकारे, बारपेटा रोडवरील अमृत दास याचा त्याच्या एफटी खटल्यासाठी ६०,०००/- रुपये आणि गुवाहाटी उच्च न्यायालयासमोर त्याच्या खटल्यासाठी आणखी ६०,०००/- रुपये खर्च केल्यानंतर अटक छावणीतच मृत्यू झाला.

आणखी एका घटनेमध्ये, चिरांग जिल्ह्यातील फरमाईशाली गावातील रहिवासी सहर अली याने वकिलाला ५०,०००/- रुपये दिले आणि तीन वर्षे एफटी येथे नियमित सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी आणखी ३०,०००/- रुपये खर्च केले आहे आणि त्याचे नाव १९५१च्या एनआरसीमध्ये आणि १९७१च्या मतदार यादी मध्ये असून सुद्धा त्याला स्ट्रीमलाईन (१९६६ ते १९७१च्या दरम्यान भारतीय हद्दीत आली आहे असे मानलेली व्यक्ती) भारतीय म्हणून घोषित करण्यात आले. एक स्ट्रीमलाईन भारतीय म्हणून त्याच्या नशिबाने त्याचे नाव त्याच्या वकिलांनी त्याच्या माहितीशिवाय परदेशी नागरिक क्षेत्रीय नोंदणी कार्यालयात (एफआरआरओ) नोंदवले आहे.

मात्र त्याच जिल्ह्यातील ऑक्सिगुडी गावातील रवींद्र मलिक याला १९९९ मध्ये स्ट्रीमलाईन परदेशी नागरिक म्हणून घोषित करण्यात आले होते, मात्र त्याचे नाव एफआरआरओकडे नोंदवले गेले नव्हते. या कारणामुळे रवींद्र मलिकला ताब्यात घेऊन गोआलपारा अटक छावणीमध्ये डांबण्यात आले, जिथे तो २१ सप्टेंबर २०१६ पासून खितपत पडून आहे. रवींद्र मल्लिक यांच्या कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार त्यांनीही एफटीमधील एका वकिलाला ६०,०००/- रुपये तर उच्च न्यायालयातील खटल्यासाठी एका वकिलाला आणखी १,५०,०००/- रुपये दिले.

**इतकी प्रचंड मानवी आणि भौतिक किंमत पाहता, एनआरसी राबवणे भारताला परवडेल का?**

# राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी

## राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (एनपीआर) काय आहे, ज्याची गणना एप्रिल 2020 पासून सुरू होईल आणि सप्टेंबर 2020 मध्ये पूर्ण होईल?

२००३ मध्ये, नागरिकत्व कायद्याअंतर्गत, नागरिकत्व (नागरिक नोंदणी आणि राष्ट्रीय ओळखपत्रे जारी करणे) नियम, २००३ मंजूर करण्यात आले. एनआरसी नियम म्हणजे हेच आहेत. याअंतर्गत, नागरिकत्व स्थिती निश्चित करण्यासाठी केंद्र सरकार घरोघरी जाऊन नागरिक गणना करू शकेल. याद्वारे पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीचे (एनपीआर) संकलन होईल. या उपक्रमादरम्यान, ज्यांचे नागरिकत्व संशयास्पद आहे अशा सर्वांना पुढील चौकशीसाठी लोकसंख्या नोंदणीमध्ये चिन्हांकित केले जाईल. पडताळणी संपल्यानंतर त्या व्यक्तींना त्वरित यासंबंधी विहित स्वरुपात माहिती देण्यात येईल आणि नियमांनुसार, अंतिम निर्णय घेण्यापूर्वी त्यांना आपली बाजू स्पष्ट करण्याची संधी दिली जाईल.

**तथापि, नागरिकत्वाच्या पुराव्यासाठी, म्हणजेच एनपीआरमध्ये समावेश होण्यासाठी किंवा वगळले जाण्यासाठी निकष / कागदपत्रे काय असतील याबाबत स्पष्टता नाही.**

३१ जुलै, २०१९ रोजी, नागरिकत्व (नागरिक नोंदणी आणि राष्ट्रीय ओळखपत्रे जारी करणे) नियम, २००३ च्या नियम ३ च्या पोट-नियम (४) च्या अनुषंगाने केंद्रीय गृहमंत्रालयाने एक आदेश (एसओ २७५३) जारी केला. त्या आदेशाअंतर्गत "सरकार राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (एनपीआर) तयार व अद्ययावत करण्याचा निर्णय घेत आहे". या अधिसूचनेनुसार, "आसाम वगळता देशभरात घरोघरी जाऊन मोजणी करण्याचे फील्डवर्क" एप्रिल २०२० मध्ये सुरू होईल आणि सप्टेंबर २०२० पर्यंत पूर्ण होईल. "सामान्यपणे स्थानिक निबंधकांच्या कार्यक्षेत्राच्या हद्दीत राहणाऱ्या सर्व व्यक्तींविषयी माहिती गोळा केली जाईल."

३० सप्टेंबर, २००९ रोजी, दुसऱ्या एका अधिसूचनेद्वारे (जी.एस.आर. ६२३ (ई)), १९६४ मधील परदेशी न्यायाधिकरणांशी संबंधित आदेशात बदल करून त्यांना संपूर्ण भारतासाठी लागू केले गेले.

## राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी आणि एनआरसी

राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी म्हणजे नागरिकत्व कायद्यानुसार माहिती पडताळून केलेली नागरिकांची नोंदणी आहे. यामध्ये देशांतर्गत तसेच देशाबाहेर राहणारे, लहान गावे किंवा ग्रामीण भागात राहणारे, शहरांमध्ये किंवा प्रभागात राहणारे, तसेच सीमांकन केलेल्या (नागरिक नोंदणी महानिबंधकांद्वारे सीमांकित) भागात असणारे रहिवासी या सर्वांचा समावेश आहे. जनगणना कायद्याप्रमाणे ज्याप्रमाणे लोकसंख्येची आकडेवारी, कल इत्यादी ठरवण्यासाठी जनगणना करण्यात येते; त्याप्रमाणेच एनपीआर ही नागरिकत्व नोंदणी आहे. म्हणूनच एनपीआर मध्ये समावेश करणे किंवा वगळणे यासंबंधीचे निकष ठरविताना, नागरिकत्व कायद्यामध्ये नमूद केलेल्या अधिनियमांचे आणि पुराव्यासंबंधी (जन्माचा दाखला इत्यादी) कायद्याचे अनुसरण करणे आवश्यक आहे. आजच्या परिस्थितीनुसार, भारतीय जनगणनेचे यापुढील सर्वेक्षण २०२१ करण्यात येणार आहे. म्हणून, २०२० मध्ये आयोजित एनपीआर हे एनआरसीचे अंतिम अद्यतन करण्याच्या उद्देशाने केले जाईल असे मानणे अवाजवी ठरणार नाही.

नागरिकांची घरोघरी जाऊन गणना (एप्रिल ते सप्टेंबर २०२० दरम्यान) सुरू झाली की, नागरिकांनी या प्रक्रियेत सामील होणे आवश्यक आहे. २००३ च्या नियमांनुसार, शेरा दिल्यानंतर ९० दिवसांच्या आत, उपजिल्हा किंवा तालुका निबंधक त्यांचा निकाल ठरवतील. काही आक्षेप असल्यास ते आमंत्रित करण्यासाठी किंवा एखाद्या नावाचा समावेश करण्यासाठी, स्थानिक नोंदणीचा मसुदा प्रकाशित केला जाईल. यानंतर, ज्या व्यक्तींचा काही आक्षेप असेल किंवा काही तक्रार असेल त्यांना तक्रारीचे स्वरूप आणि कारणांसह त्यांची तक्रार ३० दिवसांच्या आत नोंदवावी लागेल. अशा तक्रारी उपजिल्हा किंवा तालुका निबंधक विचारात घेतील आणि ९० दिवसांत त्यांचा निवाडा करण्यात येईल. वरील आदेशांवर नाखूष असलेली व्यक्ती त्यानंतरच्या ३० दिवसात नागरिकत्व नोंदणी जिल्हा निबंधकांकडे अपील करू शकते.

सदर पक्षाच्या सुनावणीनंतर ९० दिवसांत जिल्हा निबंधक अंतिम निर्णय घेतील. यानंतर अंतिम नोंदणी प्रकाशित झाल्यानंतर प्रत्येक नागरिकास राष्ट्रीय ओळखपत्र दिले जाईल. या सर्व प्रक्रियेमध्ये, आज अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार, परदेशी न्यायाधिकरणाची कोणतीही भूमिका नाही. जर तुम्ही नागरिक म्हणून नोंदणीकृत नसाल, तर तुम्हाला परदेशी नागरिक

समजले जाईल आणि त्याचे सर्व परिणाम त्यापाठोपाठ येतील. यात अटक छावण्यांत पाठविले जाणे, हद्दपार केले जाणे इ. समाविष्ट असेल.

सामान्यपणे स्थानिक निबंधकाच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या सर्व व्यक्तींशी संबंधित माहिती गोळा करुन राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी तयार केली जाते.

# अखिल भारतीय एनआरसी

**राष्ट्रीय नागरिक नोंदणी म्हणजे काय आणि तिला काय कायदेशीर आधार आहे? राष्ट्रव्यापी एनआरसीचा भारतीयांसाठी काय अर्थ होतो?**

**2020 ची एनपीआर प्रक्रिया अखिल भारतीय एनआरसीकडे जाते का?**

३१ जुलै २०१९ ची एमएचए राजपत्र अधिसूचना राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीच्या तयारीकरिता होती.

**एनआरसीशी या एनपीआरचा काही संबंध आहे का?**

होय, नागरिकत्व (नागरिक नोंदणी आणि ओळखपत्र जारी करणे) नियम, २००३ मध्ये विहित तयारी कार्यपद्धतीनुसार एनपीआर मधून मिळालेल्या माहितीचा स्थानिक नागरिक नोंदणी (जी एनआरसीचा भाग आहे) अद्ययावत करण्यासाठी योग्य त्या पडताळणी आणि छाननीनंतर वापर केला जाईल.

**31 जुलै 2019 ची एमएचए राजपत्र अधिसूचना, ही म्हणूनच, अखिल भारतीय एनआरसीच्या अंमलबजावणीची सुरुवात आहे का?**

नागरिकत्व (नागरिक नोंदणी आणि राष्ट्रीय ओळखपत्र जारी करणे) नियम, २००३ मधील नियम ४ मध्ये एनआरसीची तयारी निर्दिष्ट (वर उल्लेख केल्याप्रमाणे) केली आहे, तर वरील नागरिकत्व नियमांच्या नियम ६ मध्ये एनआरसीची सुरूवात निर्दिष्ट आहे. आतापर्यंत नियम ६ नुसार असलेले निर्देश दिले गेलेले नाहीत.

परंतु, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीची तयारी हा अखिल भारतीय एनआरसीसाठी आवश्यक पाया असल्याने आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी नेत्यांनी जी व्यापक विधाने केली आहेत, ती पाहता, असे समजणे शहाणपणाचे ठरेल की सध्याची व्यवस्था अखिल भारतीय एनआरसीच्या तयारीसाठी पायाभरणी करत आहे. भारतातील रहिवाशांनी या प्रक्रियेबद्दलची पूर्ण माहिती करून घेतली पाहिजे, जागरूकता निर्माण केली पाहिजे, याबद्दलच्या सर्व बाबी समजून घेऊन फार उशीर होण्यापूर्वीच त्यांना असलेल्या शंका आणि प्रश्न उपस्थित करायला हवेत. बरेच स्थानिक समुदाय आधीपासूनच कागदपत्रे मिळवण्याच्या आणि जन्माच्या दाखल्यांसह इतर विद्यमान कागदपत्रे अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत आहेत, जेणेकरून त्यांची नोंद स्थानिक लोकसंख्या नोंदणीमध्ये योग्यरित्या केली जाईल, हीच माहिती पुढे एनआरसीची पायाभूत माहिती होईल. अनेक स्थानिक समुदाय, राजपत्रांच्या अधिसूचनेद्वारे नावांमधील विसंगती सुधारली जाईल हेही सुनिश्चित करत आहेत.



*सायरा बेगमचे कुटुंब तिने आत्महत्या केल्यानंतर*

एनआरसीच्या यादीतून नाव वगळले जाण्याच्या ऐकीव बातमीवरून एका महिलेने केली आत्महत्याः तेझपूर, आसामः अंतिम यादीतून नाव वगळले जाण्याच्या निराशेतून आणि भयाने सायरा बेगमने ३१ ऑगस्ट २०१९ रोजी आत्महत्या केली. नाव वगळले जाण्याच्या बदनामीला घाबरून तिने तेझपूर दुलाबारी क्र. १ मधील तिच्या घराजवळच्या विहिरीत उडी मारली. दुर्दैव म्हणजे, सायरा बेगमचे नाव यादीत समाविष्ट होते आणि यादी प्रकाशित झाल्यापासून सव्वा तासात तिच्या मृत्यूची बातमी आली.

**एनआरसीबाबत आसाम आणि भारतातील इतर भागांमधील फरक**

एनआरसी ही नागरिकांची नोंदणी आहे. म्हणूनच एनआरसीसंबंधी आसाम आणि उर्वरित भारतीयांमधील पहिला फरक म्हणजे नागरिकतेसाठी कोण पात्र ठरेल? याबाबतची माहिती याआधीच वर दिलेली आहे.

दुसरा फरक असा आहे की, आसाममध्ये व्यक्तींना नोंदणीकृत होण्यासाठी अर्ज करावा लागेल; तर उर्वरित भारतात व्यक्तींना अर्ज करावा लागणार नाही, परंतु सरकारला घरोघरी जाऊन सर्वेक्षण करावे लागेल आणि ते सर्वेक्षण लोकसंख्या नोंदणीमध्ये समाविष्ट करावे लागेल. हे एनआरसीचा मसुदा बनविण्यासारखेच आहे, ज्यानंतर अंतिम एनआरसी तयार करण्यात येईल. ३१ जुलै २०१९ रोजी केंद्र सरकारने एनआरसी नियमांनुसार १.४.२०२० ते ३०.९.२०२० दरम्यान लोकसंख्या नोंदणी आणि घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यासाठीची अधिसूचना जारी केली. या तारखा जवळ येताच आपली नोंदणी होईल हे सुनिश्चित करण्यासाठी सर्व प्रकारच्या नागरिकांना सतर्क राहावे लागेल.

## आपण काय करायला पाहिजे?

- जर भारतीय जनगणनेच्या प्रक्रियेप्रमाणेच एनआरसी प्रक्रिया सर्वसमावेशक नसेल तर तिला आव्हान देऊ शकतो.
- या प्रश्नावर आपल्या लोकप्रतिनिधींशी आणि राजकीय पक्षांशी संवाद साधू शकतो.
- क्षेत्रनिहाय मोहल्ला गट सुरू करू शकतो

वारंवार विचारले जाणाऱ्या प्रश्नांसह तुमच्या विशिष्ट संभाव्य शंका, चिंता आणि प्रश्नांची उत्तरे असलेले आणखी साहित्य आम्ही तयार करत आहोत. त्यासाठी आमच्याशी संपर्क साधा.

प्रशिक्षणासाठी आणि तयार एनआरसी किटसाठी आमच्याशी संपर्क साधा info@cjp.org.in

### सरकारकडून उत्तरे मागू शकतो

- कट ऑफ तारीख: ही तारीख कोणती असेल? २७ जानेवारी १९५०? १९८७?

- कागदपत्रे अद्ययावत करा: कागदपत्रे अद्ययावत करा: आपण, नागरिकांनी, जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा, जन्माचा पुरावा किंवा जन्म दाखला प्रमाणपत्र, शाळा किंवा बोर्ड सोडल्याचा दाखला यांसारखी आपली सध्याची कागदपत्रे अद्ययावत करण्यात काहीच नुकसान नाही. स्वतःचे अधिकृत नाव राजपत्र अधिसूचनेतून घोषित करण्याच्या प्रक्रियेद्वारे नावाच्या योग्य स्पेलिंग्जमधील आणि इतर तफावती दूर करणे शक्य आहे (निवडणूक कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट व शाळा सोडल्याचा दाखला यांवर बऱ्याचदा नावांमध्ये तफावत असते).

  मतदार याद्यांमधील आणि रेकॉर्ड्समधील नावे देखील दुरूस्त करता येतात. १ एप्रिल २०२०२ पासून सुरू होणाऱ्या राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीमध्ये आपली अचूक माहिती नोंदवली गेली असल्याचे सुनिश्चित करण्यासाठी हे सर्व करता येऊ शकते. न्यायालयीन विवादांमार्फत कोणत्याही जमीन किंवा घर मालकीच्या नोंदी एकत्र करणे उपयुक्त ठरेल. जी सार्वजनिक कागदपत्रे आवश्यक आहेत ती खाजगीरित्या नव्हे तर राज्य प्राधिकरणांनी जारी केलेली असावीत. ज्यांचे जन्म घरीच नोंदणीशिवाय झाले आहेत किंवा कमी वयात लग्न झाले आहे त्यांच्यासाठी ग्रामपंचायत प्रमाणपत्र हे देखील एक कागदपत्र आहे.

## अखिल भारतीय एनआरसी संदर्भातील काही समस्या आणि प्रश्न

संपूर्ण भारतभरात एनआरसी लागू होण्याच्या शक्यतेमुळे भारतभरात चिंता आणि भीती वाढत असताना, एनआरसी बद्दलचे काही मूलभूत प्रश्न दुर्लक्षिले गेले आहेत.

### एनआरसीसाठी कट-ऑफ तारीख काय असेल?

- भारतातील एनआरसीच्या संदर्भात आत्तापर्यंत हे कुठेही नमूद करण्यात आलेले नसले तरीही जर ही एक नागरिक नोंदणी असेल तर ती तारीख २७ जानेवारी १९५० हीच असली पाहिजे. २७ जानेवारी १९५० (भारतीय राज्यघटना अंमलात आल्यानंतरचा दिवस) ही पायाभूत तारीख गृहीत धरली तर, नागरिकत्वाचा कायदा लागू होईल.

- १९५०–१९८७ : जन्म<br>१९८७–२००४: एक पालक भारतीय म्हणून जन्माला आलेला आहे<br>२००४ नंतर: एक पालक भारतीय आहे, दुसरा "अवैध स्थलांतरित" नाही

- १९५१ एनआरसी हा पडताळणीसाठीचा पायाभूत दस्तावेज आहे, असे सांगणारी कोणतीही माहिती चुकीची आहे कारण १९५१ एनआरसी फक्त आसामसाठी तयार करण्यात आली

होती, १९५१ एनआरसी मध्ये इतर कोणत्याही राज्यासाठी माहिती गोळा करण्यात आलेली नव्हती, त्यामुळे १९५१ एनआरसी लागू होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

**एनपीआर साठी कट-ऑफ तारीख, कार्यपद्धती, समावेश आणि वगळण्यासाठीचे निकष काय असतील?**

**आपण हे प्रश्न विचारले पाहिजेत:**

- शासनाच्या संपूर्ण भारतासाठीच्या एनआरसीमागे तत्त्व आणि दृष्टीकोन काय असणार आहे ?
- भारतीय राज्यघटनेच्या दृष्टीकोनाने बद्ध असलेले शासन, समावेश आणि वगळण्यासाठी एक तत्त्वनिष्ठ दृष्टीकोन अवलंबेल का ?

## समाजाने नाकारले, एनआरसीने त्यावर शिक्कामोर्तब केले

विस्कळीत कुटुंबांमधील मुले, जी आसाममधील त्यांच्या नातेवाईकांबरोबर (आजी-आजोबा, मावश्या व इतर, नातेवाईक) राहत आहेत, ज्यांच्या पालकांचे रेकॉर्ड्स नाहीत किंवा गहाळ झाले आहेत, त्यांची नावे एनआरसीमध्ये नाहीत! जी अनाथ मुले शासकीय अनाथाश्रमात राहत आहेत त्यांच्यासाठी विशेष व्यवस्था केली गेली आहे मात्र कुटुंब किंवा समुदायासोबत राहणाऱ्या अनाथ मुलांना बाहेर टाकले किंवा वगळले गेले आहे!

सुमारे २००० हून अधिक किन्नरांना (ट्रान्स) कदाचित कुटुंब वृक्षाच्या निकषांमधील गुंतागुंतीमुळे एनआरसीच्या पहिल्या मसुद्यात (त्यांना इच्छित लिंग ओळखी प्रमाणे) स्थान मिळाले नाही. अनेक ट्रान्स व्यक्तींना ते मोठे होत असताना आसाममध्ये तीव्र कौटुंबिक हिंसेचा सामना करावा लागतो आणि सहसा त्यांच्या किशोरवयात एकतर त्यांना घरातून हाकलले जाते किंवा ते स्वत:च्या मर्जीने घर सोडतात. काहीजण राज्यातचकिंवा देशाच्या इतर भागांत स्थलांतरित होतात. लैंगिकदृष्ट्या अनुरूप नसल्याबाबतच्या खोलवर रुजलेल्या लांच्छनामुळे त्यांचे कुटुंबीय अधिकृत रेकॉर्ड्समध्ये त्यांना आपली अपत्ये म्हणून नोंदच न करण्याची किंवा त्यांच्या जन्माच्या वेळी त्यांना नेमून देण्यात आलेले लिंग सांगण्याची शक्यता असते.

२६ वर्षीय रिंकी आसामच्या तेझपूर जिल्ह्यातल्या हरमती गावातील आहे. राज्यातील ज्या फारच कमी ट्रान्स व्यक्तींचे नाव जुलै २०१८ मध्ये प्रकाशित झालेल्या एनआरसीच्या अंतिम मसुद्यामध्ये समाविष्ट झाले आहे त्यांच्यापैकी ती एक आहे. परंतु वेदनादायक विरोधाभास म्हणजे

एनआरसीमध्ये नोंद झालेले नाव हे तिचे मृत नाव किंवा जन्म नाव आहे. ती याकडे लक्ष वेधून विचारते, "ज्या नावाशी माझा काहीही संबंध नाही त्या नावाने नोंद होण्यात काय अर्थ आहे ? मला कधीकधी तर जीव द्यावासा वाटतो. मी धड इकडेही नाही किंवा तिकडेही नाही."

२०११च्या जनगणनेनुसार राज्यात ट्रान्स लोकसंख्या (प्रामुख्याने ट्रान्स महिला) ही ११,३७४ इतकी होती पण ही संख्या जास्त असण्याची शक्यता आहे. ऑल आसाम ट्रान्सजेंडर असोसिएशन (एएटीए - आटा) च्या म्हणण्यानुसार, राज्यात किमान २०,००० ट्रान्स व्यक्ती (सामान्यपणे अशा व्यक्ती ज्या 'ट्रान्स स्त्री' किंवा फक्त 'स्त्री', 'ट्रान्स पुरुष' किंवा फक्त 'पुरुष' किंवा 'तृतीयलिंगी' म्हणून ओळख सांगतात) आहेत. आटाच्या म्हणण्यानुसार या व्यक्तींपैकी केवळ २,००० हजार जणांनीच एनआरसीमध्ये समाविष्ट होण्यासाठी अर्ज केला आहे.

**भारतीय राज्यघटनेचे कलम 14 आणि कलम 21 यांच्या संदर्भाने चर्चा व्हायला व्हावी.**

- **मतदार नोंदणी:** भारतात १००% मतदार नोंदणी झालेली नाही. विशेषतः हल्ली, जनतेतील विशिष्ट उपेक्षित घटकांना मतदानाच्या हक्कापासून दूर ठेवण्याबद्दलच्या म्हणजे त्यांना मतदानाचा मूलभूत हक्क नाकारण्याच्या गंभीर समस्या आणि चिंता व्यक्त होत आहेत.

  एक देश म्हणून आपण सर्व भारतीयांची मतदार म्हणून नोंदणीसुद्धा करू शकलेलो नसताना, आपण एक न्याय्य नोंदणी प्रक्रिया (एनपीआर किंवा एनआरसी) राबवू शकू, अशी अपेक्षा आहे का ?

- **जन्म नोंदणी सांख्यिकी:** जन्म नोंदणी सांख्यिकी: जन्म व मृत्यू नोंदणी कायदा १९६९ मध्ये लागू करण्यात आला. या कायद्यानुसार सर्व जन्मांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. मात्र युनिसेफच्या म्हणण्यानुसार, देशातील सध्याचे जन्म आणि मृत्यूंच्या नोंदणीचे प्रमाण जन्मांसाठी ५८% आणि मृत्यूसाठी ५४% इतके आहे. म्हणजे जर जन्मांची नोंदणीसुद्धा १००% होत नसेल तर एनपीआर/एनआरसी सर्वसमावेशक असेल, अशी अपेक्षा आपण कशी काय करू शकतो ?

- **घरांबद्दलची सांख्यिकी:** जनगणना २००१ नुसार, १८७ दशलक्ष घरे वास्तव्यासाठी किंवा वास्तव्य आणि इतर वापरासाठी आणि १९२ दशलक्ष परिवारांकडून वापरली जात आहेत, असा अहवाल आलेला आहे. २०११च्या जनगणनेनुसार, भारतात २४.६७ कोटी परिवार आहेत. लाईव्हमिंटमधील लेखात या बद्दल अधिक वाचा: भारताच्या गृहनिर्माण क्षेत्राबाबत

पाच चार्ट.

- **पासपोर्टः** आजच्या घडीला भारताच्या १.३ अब्ज या एकूण लोकसंख्येपैकी केवळ ६५ दशलक्ष पासपोर्टधारक आहेत.

- **एलआयसी कागदपत्रेः** आजही भारतात विमा उतरवण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे, आणि स्पष्टच बोलायचं तर विमा ही एक विशेष बाब आहे कारण आरोग्य आणि संपत्तीच्या मात्र त्यापुरत्याच मर्यादित नसलेल्या अशा अपात्रतेच्या अनेक घटकांमुळे बऱ्याच लोकांना तो नाकारला गेला आहे. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या (आयआरडीएआय) आकडेवारीनुसार (भारतीय विमा सांख्यिकीबाबत माहितीपुस्तिका, २०१६-२०१७) प्रत्येक पॉलिसी एका विशिष्ट नागरिकाशी संबंधित असल्याचे गृहित धरले तर जीवन विमा संरक्षण असणाऱ्या लोकांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या २५ टक्के आहे, म्हणजे ७५ टक्के किंवा ९८८ दशलक्ष भारतीयांना विमा-संरक्षण नाही.

- **बँक खातीः** आजही १९० दशलक्षांहून अधिक लोकांचे बँकेत खाते नाही.

ज्यांच्याकडे स्वतःच्या मालकीची जागा किंवा घरे नसतील, त्यांच्यासाठी एनपीआर/एनआरसी करता पुरावे/कागदपत्रे यांची मानके काय असतील?

- **स्थलांतरीत कामगारः** त्यानंतर स्थलांतरीत कामगार असलेल्या लाखो भारतीयांचा प्रश्न उभा राहतो, जे आपल्या कायमच्या वास्तव्याच्या ठिकाणी राहत नाहीत.

- ज्यांच्या मालकीची घरे नाहीत, जमिनी नाहीत आणि ज्यांना अगदी मतदानाचा हक्कसुद्धा नाही, त्या भारतीय स्थलांतरीत कामगारांची नोंदणी किंवा नोंद एनपीआर/एनआरसी कशी करणार? राज्यातील कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणे आवश्यक असलेल्या या गटासाठी ही प्रक्रिया (समावेश/वगळणे) अघोरी आणि दुःखद ठरेल.

- **भारतातील साक्षरता दर** (२०१८) हा युनेस्कोनुसार ७०.४७% आहे. जर एनपीआरला माहिती देणारी प्रक्रिया, निकष, कार्यपद्धती (जी 'घरोघरी' सर्वेक्षण अशी आहे) जनगणनेप्रमाणे नसेल ज्यामध्ये माहिती गोळा केली जाते (समावेशक) तर यातून आसामसारखे पण त्याहीपेक्षा मोठ्या प्रमाणावरील संकट निर्माण होण्याचा धोका आहे.

- **'शासकीय' जमिनीवर पुनर्वसन केले गेलेले आदिवासी, वनवासी, भूमिहीन छोटे शेतकरी, झोपडपट्टीवासीय, दंगलग्रस्त:** असे लाखो भारतीय आहेत ज्यांचे सध्या ज्या जमिनीवर वास्तव्य आहे ती कायदेशीरदृष्ट्या किंवा कागदपत्रांनुसार त्यांच्या मालकीची नाही परंतु गेली अनेक दशके त्यांचा तिच्यावर ताबा आणि वहिवाट आहे. "शासकीय जमीन" म्हणून सार्वजनिक जमीन असलेल्या या भूमीवर अंतिम आणि पूर्ण नियंत्रण प्रस्थापित करण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे जेणेकरुन कोट्यवधी लोक अनधिकृत बनतील. गेल्या ७० वर्षांत देशभरात झालेले विस्थापन मोठ्या प्रमाणावर उलथापालथ, मूलभूत मानवाधिकार नाकारले जाणे आणि गरीबीला कारणीभूत ठरले आहे. आता, वाईट हेतूने आणि कोणत्याही चर्चेशिवाय एनपीआर-एनआरसी राबवण्याच्या धोक्यामुळे मोठ्या प्रमाणावर भारतीय नागरिकांचा मतदानाचा हक्क काढून घेतला जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लाखोंचा एक प्रकारे नागरी मृत्यू. जरी तत्काळ लक्ष्य हे निःसंशयपणे धार्मिक अल्पसंख्यांक (विशेषतः मुस्लिम) असले तरीही, उघडपणे मान्य केलेला हिंदुराष्ट्र निर्मितीचा हा प्रकल्प पाहता अंतिम विश्लेषणानुसार, असुरक्षित आणि उपेक्षित वर्गातील सर्व भारतीयांना लक्ष्य आणि त्यांच्यावर वार केले जाण्याचा धोका आहे.

- वन जमिनींची मालकी व देखभाल वन निवासी आणि आदिवासींकडे असते. वन हक्क कायदा २००६ अन्वये त्यांच्या ऐतिहासिक वारशावर कायदेशीररित्या वैयक्तिक आणि सामुदायिक हक्क प्रस्थापित करण्यासाठी ते आज संघर्ष करत आहेत. या समाजघटकांवर एनपीआर-एनआरसी कसा परिणाम करेल?

आपल्या सार्वजनिक संघर्षांमध्ये आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की जरी राजकीय योजनांचे उद्दीष्ट हे धर्म, भाषा किंवा जातीच्या आधारावर भारतीयांचे विभाजन करणे असले तरी, अखेरीस जेव्हा अशी एखादी व्यापक गोष्ट सुरू होते तेव्हा भारतीयांच्या कोणत्याही घटकाला सोडले जाणार नाही. आसामच्या अनुभवात आपल्याला दिसले की, कष्टकरी वर्ग, छोटे शेतकरी, छोटे व्यापारी, दलित, बंगाली, मुस्लिम, गुरखा, राजबंशी, हिंदी भाषिक, असे कोणीही यातून वाचले नाही. जरी "घुसखोर" हे तिचे लक्ष्य असले तरी, अशी एखादी प्रक्रिया भारतीयांच्या अनेक मोठ्या घटकांना तिच्या कवेत घेईल ज्यांना यासाठी वेळ किंवा पैसे खर्च करणे खूप महागात पडेल. सत्ताधारी लोक या प्रक्रियेचा वापर भारतीयांमध्ये फूट पाडण्यासाठी करतील. सुरुवातीला तिचे स्वरूप सर्वव्यापी मुस्लिमविरोधी असेल, पण हे लक्षात ठेवा की हे सर्व एवढ्यावरच थांबणार नाही.

महाराष्ट्राने यापूर्वी दाक्षिणात्य-विरोधी, गुजराती-विरोधी, उत्तर भारतीय-विरोधी उद्रेकांच्या झळा सोसल्या आहेत. कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये सुद्धा कट्टर भाषिक वाद वाढत आहेत. केवळ तीन देशांतील "छळ झालेल्या अल्पसंख्यांकांना" निवडकपणे संरक्षण देऊन सीएबी २०१९, अंतर्गत स्थलांतरित झालेल्या मात्र "कागदपत्रे" नसलेल्या मराठी भाषिक गुजराती हिंदी लोकांची, ज्यांच्याकडे "कागदपत्रे" नाहीत त्यांचीही "मदत" करू शकत नाही.

मार्ग खडतर आहे. मार्ग धोकादायक आहे. पण एका कायमस्वरूपी सामाजिक संघर्षाला कारणीभूत ठरू पाहणाऱ्या या धोरणात एकत्रितपणे प्रतिकार करणे आवश्यक आहे. म्हणूनच आपण या एनपीआर-एनआरसी प्रक्रियेला आपल्याला फूट पाडू देता कामा नये.

सध्याच्या या परिस्थितीत मार्टिन नीमोलर यांची स्वतःच्या चुकांची कबुली देणारी कविता पुन्हा आठवण्यासारखी आहे. प्रोटेस्टंट पंथाचे पॅस्टर असलेल्या मार्टिन यांनी जर्मनीत हिटलर आणि नाझीवादाच्या उदयाची पर्वा केली नाही किंवा त्याकडे दुर्लक्ष केले आणि नंतर कम्युनिस्ट, समाजवादी, कामगार संघटना, ज्यू आणि अशा एकेक करत अनेक गटांचा अटक करून छळ करण्यात आल्यानंतर शेवटी नाझी त्यांच्यामागेही आले:

आधी ते कम्युनिस्टांसाठी आले, पण मी गप्प राहिलो,

कारण मी कम्युनिस्ट नव्हतो.

नंतर ते समाजवाद्यांसाठी आले, पण मी गप्प राहिलो,

कारण मी समाजवादी नव्हतो.

नंतर ते कामगार नेत्यांसाठी आले, पण मी गप्प राहिलो,

कारण मी कामगार नेता नव्हतो.

नंतर ते ज्यू लोकांसाठी आले, पण मी गप्प राहिलो,

कारण मी ज्यू नव्हतो.

शेवटी ते माझ्यासाठी आले,

पण मला वाचवण्यासाठी तेव्हा कोणीच उरले नव्हते.

**ही सांख्यिकी पहाता, शेवटी,**

- लाखो भारतीयांचा असा नागरी मृत्यू होऊ देऊ नका!
- शहाणपणाचा वापर करता असे दिसते की सर्व भारतासाठी एनआरसीमुळे खूप मोठ्या प्रमाणात उलथापालथी आणि आघात निर्माण होऊ शकतात.
- जर २७ जानेवारी १९५० ही नागरिकत्व 'सिद्ध' करण्याची पायाभूत तारीख असेल तर वरील सांख्यिकी लक्षात घेता, अधिकाऱ्यांचा पुराव्याच्या कागदपत्रांकडे पाहण्याचा दृष्टीकोन काय असेल?
- आगामी एनआरसीचा पाया असलेल्या एनपीआर मध्ये नाव नोंदवण्यासाठी/वगळण्यासाठी कोणती पुराव्याची मानके/ कागदपत्रे वापरली जावीत, हे ठरवण्याची कार्यपद्धती आणि निकष काय असतील? हे कोण ठरवणार?

### घटनात्मक लोकशाहीमध्ये अशी एखादी प्रक्रिया गुप्तपणे राबवली जाऊ शकते का?

हे सर्व आकडे स्मरण करण्यासारखे आहेत. भारतीय समाज हा अत्यंत वाईट विभागला गेला आहे, ज्यामध्ये 'कागदपत्र' असणे हा काही मोजक्या श्रीमंतांचा विशेषाधिकार बनला आहे. अंतर्गत स्थलांतर, नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती यांचा सर्वाधिक फटका विशेषतः दुर्लक्षित आणि विस्थापित जनतेला बसतो ज्यांना हे मानक पुरावे सादर करण्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो. भारताने स्वतःच्या स्थलांतरित कामगार वर्गाला अजूनही मतदानाचे मूलभूत हक्क दिले नाहीत. आपल्या प्रवासी कामगार-जनतेला मूलभूत मतदानाचा हक्क अद्याप दिलेला नाही. अशा परिस्थितीत स्वतःला कागदपत्रांद्वारे अस्तित्वाचे पुरावे देण्याच्या चक्रव्यूहात ढकलण्याची परवानगी भारतीयांनी त्यांच्या सरकारला द्यावी का? याबाबत संसदेत मुक्त व खुली चर्चा कुठे झाली?

आपण निस्संदिग्धपणे एनपीआर / एनआरसी नाकारले पाहिजे. #NoNRC हीच आपली रणगर्जना असली पाहिजे!

## आसाममधील भारतीय नागरिकांच्या संरक्षणासाठी सीजेपीचे अभियान:

३१ डिसेंबर २०१७ रोजी प्रकाशित झालेल्या राष्ट्रीय नागरिक नोंदणीच्या (एनआरसी) पहिल्या मसूद्यातून जेव्हा एक कोटीहून अधिक लोकांना वगळले गेले तेव्हा सीजेपीने लगेच आपल्या


कृतीला सुरुवात केली. सर्व अहवाल आणि प्रख्यात तज्ज्ञांचे अभ्यास बारकाईने अभ्यासण्यापासून ते प्रत्यक्ष परिस्थितीची खात्री करण्यासाठी जून २०१८ मध्ये आमचे स्वतःचे तथ्य-शोधक पथक पाठवण्याचा पर्यंत तसेच ३१ जून २०१८ रोजी प्रकाशित झालेल्या अंतिम मसुद्यातून वगळण्यात आलेल्या असहाय्य, गरीब आणि अशिक्षित लोकांना दावे दाखल करण्याच्या प्रक्रियेत मदत करण्यासाठी जवळजवळ १००० स्थानिक स्वयंसेवकांची टीम जमवण्यापर्यंत, खऱ्या भारतीय नागरिकांना त्रास होऊ नये हे सुनिश्चित करण्यासाठी सीजेपी कटिबद्ध राहिली आहे.

२०१९ मध्ये, सिटिजन्स फॉर आसाम या आमच्या अभियानाचा भाग म्हणून, राज्यातील भारतीयांची वाईट अवस्था दुरावस्था दाखवून देण्यासाठी आम्ही प्रख्यात वकील आणि पत्रकारांचे एक प्रतिनिधीमंडळ आसामला नेले. कोणत्याही खऱ्या भारतीयाला त्रास सहन करावा लागू नये हे सुनिश्चित करण्याचा निर्धार केलेल्या सीजेपीने नागरिकत्वाची संकल्पना, बेकायदेशीर स्थलांतरिताची व्याख्या आणि ज्या लोकांच्या नागरिकत्वावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे त्यांच्या वारसांची चिंता या मुद्द्यांकडे बारकाईने पाहण्यासाठी ऑगस्ट २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

**हसन अली:** आत्महत्येच्या प्रयत्नातून वाचलेल्या अलीचे सीजेपीने अर्ज भरण्याच्या प्रक्रियेदरम्यान समुपदेशन केले होते व मदत केली होती आणि त्याचे नाव आता अंतिम एनआरसीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे! एनआरसीच्या अंतिम मसुद्यातून नाव वगळले गेल्यामुळे मार्च ते ऑगस्ट २०१९ दरम्यान हंस चारा खेड्यातील रहिवासी हसन अलीने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. जेव्हा त्याच्या मित्रांनी त्याने फाशी घेण्यासाठी झाडाला बांधलेली दोरी कापली तेव्हा तो वाचला. सीजेपीचे स्वयंसेवक ३० मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर हसन अलीला समुपदेशन, कायदेशीर व प्रशासकीय सहाय्य अशी सर्व प्रकारची मदत करण्यात आली!



हसन अली



गोपाल दास

**गोपाल दास:** जुलै २०१८ मध्ये एनआरसीचा अंतिम मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर चिरांग जिल्ह्यातील कोप्टुपली गावात राहणारा ५२ वर्षांचा रहिवासी गोपाळ दास पार हादरून गेला होता. सर्व कागदपत्रे असूनही त्याच्या संपूर्ण कुटुंबाला या यादीतून बाहेर ठेवले

गेले होते. सीजेपी या कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली आणि आता त्यांची नावे अंतिम एनआरसीमध्ये समाविष्ट झाली आहेत. गोपाळ दास यांच्या वडिलांचे नाव माखन दास असे आहे. त्यांच्या पत्नीच्या आजोबांचे नाव सुद्धा माखन दास आहे. यामुळे अधिकाऱ्यांना बनावट वारसा (लेगसी) व्यक्ती वापरली जात असल्याची शंका आली. गोपाळ त्या वेळी त्यांच्या मानसिक आरोग्याची आठवण करून देतात, "माझ्यासमोर सर्वत्र अंधार साचला होता. आता सर्व काही संपले असेच मला वाटले होते. आमच्यावरील त्यांचा आरोप हास्यास्पद होता. माझ्याकडे सर्व कागदपत्रे असूनही त्यांनी माझ्यावर खोटारडेपणाचा आरोप केला. ते सर्व खूप निराशाजनक होतं."

ऑगस्ट २१ ते २३, २०१९ दरम्यान आम्ही गुवाहाटी येथे एक तीन-दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती ज्यामध्ये यादी प्रकाशित झाल्यानंतर नागरिकत्वाचा क्लिष्ट मुद्दा हाताळण्यासाठी स्थानिक आणि जिल्हा पातळीवरील वकिलांना आणि पॅरालीगल स्वयंसेवकांना आवश्यक ती सखोल कौशल्ये आणि प्रशिक्षण प्रदान करण्यासाठी कायदेतज्ञ आणि वकिलांनी मदत केली. एम्पॉवरिंग आसाम या आमच्या उपक्रमाचा भाग म्हणून राज्यात अशा आणखी कार्यशाळांचे नियोजन केले आहे.

अर्जदाराला 'परदेशी नागरिक' घोषित केल्या जाण्याच्या निर्णयांमागील महत्त्वाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी आम्ही १००० हून अधिक एफटी आदेशांचा अभ्यास सुद्धा आयोजित केला. एफटीमधील क्लिष्ट कायदेशीर प्रक्रिया हाताळण्यात पॅरालीगलना मदत व्हावी यासाठी आम्ही एक माहितीपुस्तिकाही बनवत आहोत.

ऑक्टोबर २०१९ मध्ये, आम्ही पीपल्स युनियन ऑफ सिव्हिल लिबर्टीज (पीयूसीएल) च्या सहकार्याने, आसाममध्ये नागरिकत्वाच्या संकटाला तोंड देत असलेल्या लोकांसाठी मुंबईमध्ये एका एकजूट बैठकीचे (सॉलिडॅरिटी मीटिंग) आयोजन केले होते. असहाय्यपणामुळे, 'परदेशी नागरिक' असल्याचा खोटा आरोप झाल्यामुळे आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेल्यांनी आणि अटक छावणीत बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांनी, कोण भारतीय आहे असे शीर्षक असलेल्या या बैठकीत त्यांचे अनुभव कथन केले.

खरं तर त्यानंतर लगेचच, अटक छावणीत बळी पडलेल्या सुब्रत डे यांचा मुलगा बिकी डे याला त्याचे शिक्षण पुढे चालू करण्यात मदत करण्यासाठी एकत्र आलो. वडिलांच्या मृत्यूनंतर नोकरी शोधून घर चालवायला मदत करण्यासाठी बिकीला त्याचे शिक्षण सोडावे लागले होते. त्याची आई

आणि आजी कापडी पिशव्या शिवून दिवसाला तुटपुंजे ४८ रुपये कमावतात.

सर्वोच्च न्यायालयाच्या मे २०१९ मधील आदेशाला अनुसरून, आम्ही आता तीन वर्षांहून अधिक काळ अटक छावणीमध्ये घालवलेल्या लोकांच्या सुटकेसाठी प्रयत्न करत आहोत. (वाचा: आसाममधील अटक केलेल्यांच्या सुटकेसाठी सीजेपीचे प्रयत्न) आमच्या आसाम अभियानाविषयी अधिक माहिती तुम्ही इथे वाचू शकता.

सीजेपीने भारतभर कार्यविस्तार केला आहे. भारताच्या सर्व राज्यांमध्ये स्थापना केल्यानंतर सीजेपी मोठ्या प्रमाणावर लोकांच्या बैठका भरवत आहे, कार्यकर्त्यांना आणि समाजाच्या नेत्यांना प्रशिक्षण देत आहे, अखिल भारतीय एनआरसी आणि नागरिकत्वाचा प्रश्न याबाबत साहित्याचे वितरण करत आहे. मुंबई, मालेगाव, बेंगलुरू, हैदराबाद, कोलकाता, पुरी, उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथे आजवर बैठका झाल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या विशेषत: दुर्बल आणि उपेक्षित व्यक्तींच्या हक्कांसाठी लढण्याचा तुमच्यासारख्या लोकांचा दृढनिश्चय हीच सीजेपीची ताकद आहे (https://cjp.org.in/friend/). प्रशिक्षण, बैठका आणि साहित्य यासाठी आमच्याशी cjpindia@gmail.com वर किंवा आमच्या वेबसाईटद्वारे (cjp.org.in) (https://cjp.org.in/volunteer/) संपर्क साधा.



| Donate to CJP | Call us for queries | CJP's work in Assam | Contact for Trainings/ NRC Kit |
|---|---|---|---|
| https://cjp.org.in/donate/ | +91 7506661171 | https://cjp.org.in/assam/ | info@cjp.org.in |

**संदर्भ (cjp.org.in ला भेट द्या):**

Who is an Indian, can the NRC decide?

How a government and bureaucracy betrayed its people

www.cjp.org.in/who-is-indian/



| | | |
|---|---|---|
| **For Bank Transfer** | : | **Citizens for Justice and Peace** |
| Savings Account No | : | 50100035940810 |
| Bank name | : | HDFC Bank |
| Branch | : | Santacruz (West) |
| MICR | : | 400240017 |
| RTGS/NEFT/IFSC | : | HDFC0000079 |

scan for paytm

आयकर कायदा, १९६१ च्या कलम ८०G नुसार CJP ला दिलेल्या सर्व देणग्यांना ५०% करसवलत आहे

cjp.org.in

